# अर्थबोधपत्रिका

## आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
## 'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY * LIBRARY *
6|9|04

१ ● संपादकीय
३ ● सत्ताकेंद्र नसलेले जग
९ ● परकीय गुंतवणूक व विकसनशील देश
१४ ● अमेरिका: वॉलमार्टच्या विरोधातील लढा
१६ ● कुपोषण, गरिबी आणि शिक्षण
२१ ● कंबोडिया: वाढता इस्लाम व दहशतवाद
२४ ● आशिया: रोजगारनिर्मितीचे आव्हान
२७ ● पाण्यातील कचऱ्यातून औद्योगिक उत्पादन
२९ ● शांततेच्या पाऊलखुणा (शतकांपूर्वीच स्त्रिया क्रियाशील)
३३ ● जगाच्या पाठीवर....(अंत्यसंस्कार)
३४ ● कालप्रवाहात......

खंड ३ : अंक ६ सप्टेंबर २००४

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

---

**वर्गणीसाठी पत्ता :**

व्यवस्थापक,

**अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटल जवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२

: २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेल : ispe@vsnl.com

---

**अर्थबोधपत्रिका**

**खंड ३ (अंक ६) सप्टेंबर २००४**

**संपादक - रमेश पानसे**

**संपादन साहाय्यक - राज्यश्री क्षीरसागर**

❖या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

## ‘अर्थबोधपत्रिके’तील माहिती कशी?

**जी सहज चाळता येईल अशी !**

❖भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे 'अर्थबोधपत्रिका' हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.** ❖मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्देश. ❖अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ❖अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ❖लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

> जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# संपादकीय

जगाची राजकीय - आर्थिक रचना, भविष्यकालात कोणता आकार घेईल याविषयी, भावीकालशास्त्राच्या (Futurology) अभ्यासकांनाच नव्हे तर अगदी सर्वसामान्य नागरिकांनाही कुतुहल असते. उद्योग - व्यापार क्षेत्रांतील लोकांना तर त्यांच्या व्यवसायिक अंदाजांसाठी, भावी कालात डोकावून पाहणे गरजेचेच असते. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापेक्षा विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जगाची राजकीय सत्ता - रचना कितीतरी बदलली होती. याच पार्श्वभूमीवर एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात काय आणि कसे बदल अपेक्षित आहेत याचा अंदाज अभ्यासक घेत आहेत. विविध पर्याय त्यांच्या डोळ्यांसमोर येत आहेत. अर्थबोधपत्रिकेच्या या अंकातील पहिल्याच लेखात या पर्यायांविषयी वाचकांना उद्‌बोधक माहिती मिळेल.

भारतात दरवर्षी दुष्काळाच्या बातम्या वृत्तपत्रातून झळकत असतात; पण त्याहीपेक्षा भयानक परिस्थिती निर्माण करणाऱ्या कुपोषणाच्या समस्येला, अगदी बालमृत्यू घडून आल्याशिवाय प्रसिद्धी मिळत नाही. कुपोषणाचा संबंध केवळ आरोग्याशी नाही,तर तो शिक्षणाशी, मानवाचा 'शिकण्याचा अवयव' जो मेंदू त्याच्याशी जोडलेला आहे. त्यामुळे नागरिकांच्या शारीरिक नि बौद्धिक विकासावर विपरित परिणाम आणि तोही कायमस्वरूपी घडवून आणणाऱ्या कुपोषणाच्या समस्येकडे जागरूकतेने पाहावे, या हेतूने या अंकात एक लेख देण्यात आला आहे.

असाच एक छोटासा, पण बेकारीच्या वाढत्या समस्येविषयीचा लेखही वाचकांना विचारखाद्य देऊन जाईल. इतर लेखही त्यांचे वेगळेपण आणि विचारधन घेऊन वाचकांना भेटताहेत.

वाचकांची प्रतिक्रियात्मक पत्रे आम्हाला मोलाची वाटतात. ती सूचना करणारी, तशीच चुका दुरुस्त करणारीही असतात. वैचारिक वाङ्‌मयाच्या वृद्धीमधील वाचकांचे हे योगदान फार महत्त्वाचे आहे. वाचकांनी, चर्चांचे व्यासपीठ म्हणून अर्थबोधपत्रिकेकडे, काही प्रमाणात तरी, बघायला हरकत नाही.

■■

# वाचकांचा प्रतिसाद

'अर्थबोधपत्रिके' चे अंक ज्ञान वाढविण्यासाठी उपयोगी आहेत. जागतिक घडामोडींची माहिती यातून मिळते. **श्रीमती. सी.व्ही दाते, सातारा**

'अर्थबोधपत्रिके'च्या ऑगस्ट २००४ च्या अंकातील 'शांततेच्या पाऊलखुणा' या लेखात PCA चा उल्लेख 'पीसमेकर्स कॉर्प्स असोसिएशन' असा केला आहे. तो 'पीसमेकर्स कॉSSर असोसिएशन' असा हवा होता. CORPS म्हणजे पथक वगैरे. CORPSE म्हणजे माणसाचे शव. 'अर्थबोधपत्रिके'त असा मुद्राराक्षसाचा विनोद क्षम्य नाही. पत्रिका छान निघते. अर्थविज्ञानात समाजविज्ञानाची सांगड असायला पाहिजे हे ऑगस्टच्या अंकातून जाणवते. **दिगंबर गाडगीळ, नाशिक.**

<u>संपादकांची टिपणी</u>

'अर्थबोधपत्रिके'च्या ऑगस्टच्या अंकातील चूक दाखवून दिल्याबद्दल आम्ही श्री. दिगंबर गाडगीळ यांचे आभारी आहोत. शांततेच्या पाऊलखुणामधील लेखात CORPS - कॉर्प्स (कॉर, कॉ, कॉSSर किंवा कोSर) म्हणजे पथक वा संघटित व्यक्तिंचा गट असाच अर्थ आहे. या लेखात हाच अर्थ अभिप्रेत आहे.

'अर्थबोधपत्रिके'तून वाचकांची काही सूचना आहे का अशी विचारणा होते, म्हणून हे पत्रलेखन. आता गणपती उत्सव जवळ आलाय, तेव्हा यानिमित्त जो विसर्जनाचा प्रश्न निर्माण होतो व होईल यावर या पत्रिकेतून लिखाण व्हावे. तसेच मोठ्या प्रमाणात अन्य मार्गांनी जनजागृती व्हावी. यासाठी धातूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना व त्याचे घरात विसर्जन हा उपाय आहे. पण यासाठी मोठ्या प्रमाणात समाजाचे मतपरिवर्तन व्हायला हवे. यासाठी काय करता येईल ? **सौ. अनुराधा भिडे, ठाणे.**

<u>संपादकांची टिपणी</u>

आपण उपस्थित केलेला प्रश्न त्यावर दिलेले उत्तर हे योग्य आहे. तथापि हा प्रश्न स्थानिक व वैयक्तिक पातळीवर सोडवायला हवा. विविध स्थानिक संस्थाही यासाठी प्रयत्नशील आहेत. स्थानिक वृत्तपत्रांमधूनही याची चर्चा होते. त्यामुळे अर्थबोधपत्रिकेने या विषयावर लिखाण प्रसिद्ध केलेले नाही.

राजकीय

# सत्ताकेंद्र नसलेले जग

अमेरिकेच्या हाती जगाची सत्ता एकवटली आहे किंवा जगाचे एककेंद्री ध्रुवीकरण (unipolarity) झाले असून ते धोकादायक ठरू शकते, असे म्हणून अमेरिकेच्या विरोधात मते व्यक्त करणारे अनेक अभ्यासक आहेत. अशांनी आपल्या मताचा वेगळ्या दृष्टिकोणातून आणि गांभिर्याने विचार करावा, असा लेख इतिहासाचे अभ्यासक नॅल फर्गसन यांनी अलीकडेच (जुलै २००४) लिहिला आहे. अमेरिकेचे समर्थन करण्याचा प्रयत्न ते करीत नाहीत, पण सत्ताकेंद्र नसलेल्या जगाची (apolarity) कल्पना त्यांनी केली आहे; आणि इतिहासातील घटनांचा संदर्भ देऊन असे जग प्रत्यक्षात येईल का, आल्यास काय होईल, अशा प्रश्नांचा वेध त्यांनी घेतला आहे.

अमेरिका हे एकमेव राष्ट्र साम्राज्यवादाचा पुरस्कार करते असे नाही; तर, संपूर्ण जगाचाच इतिहास हा साम्राज्यवादातून घडलेला आहे. एका गटाने वा देशाने दुसऱ्यावर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न यापूर्वीही अनेकदा झाला आहे. आज अमेरिकेचे नाव यासंदर्भात घेतले जाते, त्याआधी ब्रिटनने, फ्रान्सने, स्पेनने आपले साम्राज्य वाढविण्याचा प्रयत्न केला होता. आर्थिक सत्ता व लष्करी सत्ता या दोन गोष्टी जगाच्या इतिहासात नेहमीच महत्त्वाच्या ठरलेल्या आहेत. या साम्राज्यवादात कधी संस्कृती, कधी राजघराणी तर कधी राष्ट्रे सहभागी झालेली आढळतात. सत्ताकेंद्र नसलेल्या जगाचा प्रयोगही जगाच्या इतिहासाने अनुभवला आहे आणि तो फारसा आशादायी ठरलेला नाही, असे फर्गसन यांना वाटते. अमेरिकेची एकध्रुवीय सत्ता संपूर्ण जगावर नको, असे म्हटले तर त्याला पर्याय काय ? फर्गसन यांनी तीन पर्यायांची चर्चा केली आहे. एक म्हणजे, अमेरिकेच्या विरोधात उभी ठाकू शकतील अशा राष्ट्राची वा राष्ट्रांची एकध्रुवीय सत्ता, म्हणजे शीतयुद्धाच्या काळात सोव्हिएट रशियाने अमेरिकेसमोर आव्हान उभे केले होते, त्याप्रमाणे एकत्रित युरोप किंवा चीन वा मुस्लिम देशांची सत्ता हे आव्हान उभे करू शकेल. दुसरे म्हणजे, अनेक देशांची बहुध्रुवीय (multipolarity) सत्ता, आणि तीन म्हणजे, निर्ध्रुवीकरण (apolarity) किंवा सत्ताकेंद्र विरहित जग.

अमेरिकेची एकध्रुवीय सत्ता जगावर आहे आणि अमेरिका ही सत्ता सोडेल काय, किंवा परिस्थितीमुळे तशी भूमिका घेण्यास अमेरिकाला भाग पडेल काय, हा

मूळ प्रश्न आहे, असे फर्गसन म्हणतात. सध्याच्या परिस्थितीत हे कठीण दिसत असले तरी अशक्यही नाही. त्यांच्या मते तीन कारणांमुळे अमेरिकेला आपली सत्ता सोडावी लागण्याची शक्यता आहे. पहिले कारण असे की, व्यापार - उद्योगाचा विचार करता अमेरिकेला इतर देशांवर फार अवलंबून राहावे लागत आहे. इतर देशांची मदत घेऊन जगावर सत्ता गाजविण्याचे उदाहरण इतिहासात घडलेले नाही. दुसरे असे की, अमेरिका हा स्थलांतरितांचा देश आहे. मनुष्यबळ व लष्कर यांचा परस्परसंबंध पाहता अमेरिकेला केवळ अमेरिकन सैनिकांच्या जोरावर सत्ता आपल्या हाती ठेवणे शक्य होणार नाही. अफगाणिस्तान किंवा इराक येथील युद्धाच्या वेळी अमेरिकेला या प्रश्नाचा सामना करावा लागला होता. तिसरे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, अमेरिकेमध्ये अशा बाबतीत देशांतर्गत एकमत होणे हे फार कठीण आहे. अमेरिकेचे सैन्य दक्षिण कोरिया, जपान किंवा जर्मनी येथे ५० वर्षांहून अधिक काळ राहिले असले तरी व्हिएटनाम, सोमालिया, हैती किंवा लेबनॉन येथे ते जास्त टिकू शकलेले नाही. अमेरिकेतील नागरिकांना देखील, अमेरिकेच्या सैनिकांनी इतर देशांमध्ये जाऊन लढावे असे वाटत नाही. व्हिएटनाममधील युद्धाच्या वेळी अमेरिकन नागरिकांचा सरकारला जसा पाठिंबा होता तसे आता नाही. अशा परिस्थितीत अमेरिकेने जर जगावरचे आपले नियंत्रण सोडण्याचे ठरविले किंवा तसे करणे अमेरिकेला भाग पडले तर अमेरिकेची जागा कोण घेईल ? की जगाच्या इतिहासात निर्ध्रुवीकरणाचा काळ सुरू होईल ?

## अमेरिकेची जागा कोण घेणार ?

एकत्रित युरोप - पश्चिमेकडील राष्ट्रांमध्ये, अमेरिकेनंतर आता 'एकत्रित युरोप' हा दुसऱ्या क्रमांकावर आहे. युरोपमधील अनेक (सुमारे पंचवीस) देश एकत्रित आल्याने 'एकत्रित युरोप' हा अमेरिकेला पर्याय ठरू शकतो, असे म्हटले जाते. पण युरोपमधील देशांची एक मोठी अडचण ही लोकसंख्येबाबतची आहे. युरोपमध्ये युवावर्गाची संख्या जास्त नाही. मुळात लोकसंख्या कमी व आहे ती देखील प्रौढत्वाकडे झुकलेली. या देशांमध्ये मुले जन्माला येण्याचे प्रमाण कमी असून आयुर्मान वाढते आहे. जुना युरोप हा खरा प्रौढ युरोप होण्याची स्थिती आता आली आहे. इसवीसन २०५० पर्यंत इटली, स्पेन आणि ग्रीस या देशांमधील दर तीन नागरिकांमागे एका नागरिकाचे वय किमान ६५ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक असेल; त्यामुळे या देशांना विविध कामांसाठी परदेशांतील नागरिकांची मदत घ्यावी लागेल, असे दिसते. म्हणजे अमेरिका जसा स्थलांतरितांचा देश झाला आहे, तसे युरोपमधील देशांबाबतही घडू शकते. किंवा या

देशांना प्रौढांचा वा वृद्धांचा देश असे म्हणवून घ्यावे लागेल. अशा सामाजिक परिस्थितीत युरोप हा जगाचे नेतृत्व करण्याची शक्यता वाटत नाही.

<u>साम्यवादी चीनकडे जगाचे लक्ष</u>

चीनचे सध्याचे आर्थिक यश पाहता जगाचे नेतृत्व पश्चिमेकडून पूर्वेकडे येण्याची शक्यता वर्तविली जाते. येत्या तीस ते चाळीस वर्षांमध्ये चीनचे दरडोई उत्पन्न अमेरिकेच्या दरडोई उत्पन्नापेक्षा वाढेल, असा अभ्यासकांचा अंदाज आहे. आणि युरोपप्रमाणे चीनला लोकसंख्येचा प्रश्न नाही. चीन लष्करीदृष्ट्याही सक्षम आहे. पण भांडवलशाही आणि लोकशाही एकीकडे व साम्यवाद दुसरीकडे अशी ही विरोधी टोके आहेत. अपवादात्मक परिस्थितीत बाजारपेठेचे सर्व नियम बाजूला राहून वेगळेही काही घडू शकते. स्वतःच्या फायद्यासाठी चीनमध्ये गुंतवणूक करणाऱ्या (विशेषतः बँकिंग क्षेत्रातील) कंपन्यांना काही अडचणींना सामोरे जावे लागेल अशी शक्यता आहे. खुल्या धोरणातंर्गत अमेरिका व युरोपमधील काही कंपन्यांना याचा अनुभव एकदा आला होता. चीनमध्ये मालमत्ताविषयक बाबींमध्ये गुंतवणूक केल्यानंतर ती मागे घेणे हें तेव्हा शक्य झाले नव्हते.

अर्थव्यवस्थेचा व बाजारपेठेचा विचार करता दोन बाबी लक्षात येतात. एक म्हणजे, आशियातील काही राष्ट्रांमधील उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने तेथील अर्थव्यवस्थेला निर्यातीवर अवलंबून राहावे लागत आहे. दुसरी म्हणजे, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा विचार करता चीनने पूर्णपणे खुल्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केलेला नाही. अशा परिस्थितीत चीनमधील बँकिंग व्यवस्थेसंबंधी आणि चलनसंबंधीचे काही प्रश्न भविष्यात निर्माण होऊ शकतात आणि त्याचे परिणाम गंभीर होऊ शकतात. थोडक्यात, चीनची आर्थिक प्रगती ही चीनला जागतिक नेतृत्वाकडे घेऊन जाईलच असे नाही.

<u>इस्लामिक देशांचे नेतृत्व</u>

अमेरिकेच्या विरोधात इस्लामिक देश उभे ठाकू शकतात, अशी पण एक शक्यता व्यक्त करण्यात येते. युरोपमधील देशांच्या तुलनेत इस्लामिक देशांमधील जन्मदर दुपटीने जास्त आहे. त्यामुळे नजीकच्या भविष्यात, युरोप व अमेरिकेवर त्यांचा दबाव वाढण्याची शक्यता आहे. मध्य आशियातील येमेनचे उदाहरण घेऊ तेथील सध्याचा जन्मदर कायम राहिला तर इसवीसन २०५० मध्ये येमेनमधील लोकसंख्या ही रशियाच्या लोकसंख्येपेक्षा जास्त होईल. त्यामुळे युरोपला जेव्हा मनुष्यबळाची गरज

भासेल तेव्हा ही लोकसंख्या तिकडे स्थलांतरित होऊ शकेल. पण तिथे पूर्वीपासून स्थायिक झालेले मुस्लिम व नव्याने तिकडे स्थलांतरित झालेले मुस्लिम यांच्यात वैचारिक संघर्ष होऊ शकेल. शिया व सुन्नी गट एवढ्यापुरता हा संघर्ष मर्यादित राहणार नाही; तर, पश्चिमेकडील संस्कृतीशी जुळवून घेण्यावरूनही त्यांच्यात मतभेद होऊ शकतील. एक गट सुधारणावादी व एक गट परंपरागत इस्लामचा समर्थक, असे चित्र निर्माण होण्याची शक्यता आहे.

काही मुस्लिम देशांमध्ये अमेरिकाविरोधी वातावरण असले तरी आर्थिक, सामाजिक व राजकीय अशा सर्वच घटकांचा एकत्रित विचार करता मुस्लिम राष्ट्रे एकत्रित येऊन अमेरिकेच्या विरोधात सत्ताकेंद्र स्थापन करतील, असे वाटत नाही.

मग निर्ध्रुवीकरणाकडे जगाची वाटचाल होईल का ?

## इतिहासातील निर्ध्रुवीकरण

समजा, अमेरिकेने 'सुपरपॉवर' पदाचा दावा सोडला आणि तो दावा करण्यास कोणीच पुढे आले नाही तर जगाला निर्ध्रुवीकरणाचा मार्ग स्वीकारावा लागेल. यावेळी जगाचे चित्र कसे असेल ?

हे चित्र रंगविण्याआधी इतिहासाकडे एक नजर टाकणे गरजेचे आहे. लक्षात घेण्यासारखे असे आहे की, जगाच्या इतिहासात निर्ध्रुवीकरण होण्याची ही काही पहिलीच वेळ असणार नाही. अशा प्रकाराशी साधर्म्य दर्शविणारी घटना आधुनिक काळात, १९२० च्या दशकात, घडली होती. तेव्हा, 'अमेरिकेने लीग ऑफ नेशन्स'ला केंद्रस्थानी मानून जागतिक पातळीवरील लोकशाही व एकत्रित सुरक्षा याविषयीच्या, अध्यक्ष वूड्रो विल्सन यांच्या योजनेकडे पाठ फिरवली होती. आंतरराष्ट्रीय पातळीवर सत्तास्थानी पोकळी निर्माण झाली होती. युरोपमध्ये रोमानोव्ह, हॅब्सबर्ग, ओहेनझोलान आणि ओटामन यांचे साम्राज्य संपुष्टात आल्यानंतर अशीच एक पोकळी निर्माण झाली होती, अर्थात ती फार काळ टिकली नाही. पश्चिम युरोपमधील साम्राज्यवादी शक्तींनी ती संधी सोडली नाही. रशियात बोल्शेव्हिक गट पुढे आला आणि जर्मनीत नाझी गट.

याही आधीच्या काळात, म्हणजे अगदी ९ व्या व १० व्या शतकात असे घडले होते. रोमन व बायझॅन्टिन साम्राज्य पिछाडीवर होते. तेव्हा पश्चिमेचे नेतृत्व ख्रिश्चन धर्मगुरू पोप आणि शार्लमेनचे वंशज यांच्यात विभागले गेले होते. इसवीसन ९६२ मध्ये ओटामन साम्राज्याचा उदय होण्यापूर्वी एककेंद्री सत्ता अशी नव्हती. चीनमध्ये देखील एककेंद्री सत्ता नव्हती. जुनी सत्तास्थाने दुबळी होत असतानाच्या काळात नवीन

व छोटे गट सत्तास्थानाकडे जाण्याचा प्रयत्न करीत होते, असे इतिहासातून दिसते. उदाहरणार्थ, खझर जमातीने जुडाईझमचा स्वीकार केल्यानंतर त्यांनी युरेशियात, सत्तास्थानी जाण्याचा प्रयत्न केला. रिजेंट ओल्गाने ऑथ्डॉक्स चर्चकडे आपला कल दर्शवून रशियात ऑथ्डॉक्स चर्चच्या साम्राज्याचा पाया घातला. सेल्जुक्स गटानेही आपला जम बसविण्याचा प्रयत्न केला. युरोप, आफ्रिका, आशिया अशा सर्व ठिकाणी अशी लहान -मोठी साम्राज्ये उभी राहिली होती.

या काळाचे एक वैशिष्ट्य म्हणजे, विविध समाज गटांमधील धार्मिकता फार वाढलेली होती. इतकी की, धर्म -पंथनिरपेक्ष असा कारभार होऊच शकत नव्हता. धार्मिक संस्था या राजकीय निर्णयप्रक्रियेत सहभागी झाल्या होत्या. धर्म व प्रशासन वा राजकीय व्यवस्था यांच्या दैनंदिन कामकाजाची सरमिसळ झाली होती. यातूनच विविध धर्म -संस्कृतींचा संघर्ष उफाळून आला. ख्रिश्चन विरूद्ध मुस्लिम यांच्यातील प्रसिद्ध झालेली 'धर्मयुद्धे' याच काळातील. म्हणजे संस्कृतींच्या संघर्षाकडे जाणारा हा काळ, हा देखील निर्ध्रुवीकरणाचा होता, असे म्हणता येईल. राजकीय अस्थैर्याचा हा काळ, 'गोंधळाचा' किंवा 'अंधार युग' ('डार्क एज') ठरला. या काळातील राजकीय अस्थैर्याचा फायदा काही समाजगटांनी घेतला. लहान गावांमधून काही टोळ्या सशस्त्र संघर्षात उतरल्या होत्या आणि तत्कालीन व्यवस्थेविरूद्ध, शहरांवर हल्ले करण्याचे प्रयत्न झाले. होते. यानंतर काही वेगळी राजकीय केंद्रे आकाराला आली. युरोपच्या इतिहासात इसवीसन ८८६ मध्ये इंग्लंडमध्ये आल्फ्रेडने असे 'राष्ट्र -राज्य' उदयास आणले होते.

## नव्या काळातील निर्ध्रुवीकरण

इतिहासात एकाच वेळी अनेक राज्यांची सत्ता मिळविण्याची ईर्षा होती आणि विविध संस्कृतींमधील विविध गट यात पुढे येण्याचा प्रयत्न करीत होते. काही राज्यांनी सत्ता मिळविली आणि आपण सार्वभौम आहोत, अशा समजुतीत राहून त्यांनी सत्ताही गाजविली. पण प्रत्यक्षात तेव्हा जगभरातील विविध ठिकाणी विविध सत्ताकेंद्रे विखुरली गेली होती.

आधुनिक काळात, निर्ध्रुवीकरण झाले तर कशी परिस्थिती निर्माण होईल ? कोणती नवी सत्ताकेंद्रे उदयास येण्याचा प्रयत्न करतील ? या प्रश्नांचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. अमेरिका, चीन, युरोप वा मुस्लिम राष्ट्रे ही काही ना काही कारणाने जागतिक सत्ताकेंद्र म्हणून स्थिरावू शकली नाहीत, असे गृहीत धरू. पण अलीकडे, आंतरराष्ट्रीय पातळीवर, संयुक्त राष्ट्र संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक

आणि जागतिक व्यापार संघटना यासारख्या संस्था कार्य करीत आहेत. त्यांच्या कार्याचे स्वरूपच मुळी आंतरराष्ट्रीय आहे, त्यांनी जर जगावर सत्ता गाजवायचे ठरविले तर जगाचे राजकारण कोणत्या दिशेने जाईल ? जग चांगल्या दिशेने जाईल की पुन्हा एकदा जगात 'गोंधळाचा काळ' (अंधारयुग) निर्माण होईल ?

इतिहासाचा संदर्भ लक्षात घेता आजच्या काळाचे वैशिष्ट्य असे की, आजही सत्ता एकाच राष्ट्राच्या हाती राहून ती ऊर्ध्वगामी होत नाही; तर तिची वाटचाल खालच्या दिशेने होत असून सत्ताकेंद्रे विखुरली जात आहेत. हिंसाचाराच्या विविध साधनांवर कोणा एकाचे वर्चस्व राहिलेले नाही, तसेच संपर्काची माध्यमेही विविध गटांच्या हाती आहेत. संपूर्ण मानव समाजाने, विखुरलेल्या सत्ताकेंद्राच्या आणि एका ठिकाणी एकवटलेल्या सत्ताकेंद्राच्या वैशिष्ट्याच्या युगात प्रवेश केला आहे. माहिती तंत्रज्ञान आणि उत्पादनाची साधने विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमातून विविध देशांमध्ये पसरली आहेत; आणि त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हाती अधिक अधिकार जात आहेत, तसेच अनेक ठिकाणी स्वेच्छाकार्य संस्थाही अधिक अधिकार मिळवीत आहेत, असे चित्र दिसते. काही ठिकाणी धार्मिक गटही अधिकार मिळवीत असल्याचे आढळते. विनाशाची साधने आज काही अतिरेकी गटांच्या हाती आली आहेत. हे गट जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात विध्वंस घडवून आणू शकतात. म्हणजे इतिहासातील 'अंधारयुगा'च्या काळाप्रमाणे आजच्या जगातही विविध सत्ताकेंद्रे उभी राहू पाहताहेत; आणि हे देखील धोकादायक ठरू शकते. कारण, आज एखादे शहर वा राष्ट्र नष्ट करण्यासाठी काही सेकंदही पुरू शकतात. जागतिकीकरणाच्या माध्यमातून जोडल्या गेलेल्या अर्थव्यवस्थांचे फार मोठे नुकसान यातून होऊ शकते आणि जग मंदीच्या मार्गालाही जाऊ शकते. जगावर एककेंद्री सत्ता नको, असे म्हणणाऱ्यांनी विविध पर्यायांचा विचार करून त्यावर उत्तरेही शोधून ठेवली पाहिजेत.

अमेरिका जगावर सत्ता गाजविण्याचा प्रयत्न करते किंवा जगाचे ध्रुवीकरण हे एककेंद्री झाले आहे, असे म्हणून अमेरिकेवर टीका करणाऱ्यांना नॅल फर्गसन यांनी एका वेगळ्या दृष्टिकोणातून याकडे बघावे असे सुचविले आहे.

*(संदर्भ - इंटरनेट, नॅल फर्गसन यांचा 'वर्ल्ड विदाऊट पॉवर' हा लेख. फर्गसन हे न्यूयॉर्क विद्यापीठाच्या 'स्टर्न स्कूल ऑफ बिझिनेस' येथे इतिहास या विषयाचे प्रोफेसर व स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या 'हुवर इन्स्टिट्यूशन' येथील ज्येष्ठ अभ्यासक आहेत.*

■■

आर्थिक

# परकीय गुंतवणूक व विकसनशील देश

जागतिकीकरणाचे फायदे -तोटे हा अनेक देशांमध्ये सतत चर्चिला जाणारा व काहीसा वादग्रस्त असा विषय आहे. विशेषतः, विकसनशील देशांमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्याकडून करण्यात येणारी परकीय गुंतवणूक, हा विषय तर अधिकच वादग्रस्त ठरलेला आहे. या वादग्रस्त चर्चेतील काही वेगळ्या बाबींवर प्रकाश टाकण्यासाठी 'मॅककिन्सी ग्लोबल इन्स्टिट्यूट' तर्फे चीन, भारत, ब्राझील आणि मेक्सिको या देशांमधील स्थानिक उद्योगक्षेत्रावर होणाऱ्या विविध परिणामांचा अभ्यास अलीकडेच करण्यात आला. या अभ्यासात सेवा व उत्पादन क्षेत्रातील वाहने, इलेक्ट्रॉनिक्सशी संबंधित अनेकविध ग्राहकोपयोगी उत्पादने, बँकिंग, खाद्यान्न, माहिती तंत्रज्ञान आणि बिझिनेस प्रोसेस आऊटसोर्सिंग अशा विविध उद्योगांचा समावेश करण्यात आला होता. परकीय गुंतवणूक वाढल्यानंतर उत्पादकता, प्रत्यक्ष उत्पादन, रोजगार आणि किंमती यांवर कसाकसा परिणाम झाला, हे जाणून घेण्यात आले.

या अभ्यासातून असा निष्कर्ष निघाला की, विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांच्या विकासाचा विचार करता, परकीय गुंतवणूक ही उपयोगाची ठरते. सरकारची धोरणे, उद्योगांचे प्रकार आणि अभ्यास केलेला ठराविक कालावधी या बाह्य बाबींचा, या निष्कर्षांवर फारसा परिणाम होत नाही.

परकीय गुंतवणूक वाढल्यानंतर चौदापैकी तेरा उद्योगांमधील उत्पादकता व प्रत्यक्ष उत्पादन वाढले, त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली आणि किंमती कमी झाल्या. तसेच उत्पादनांचा दर्जा सुधारला. परकीय गुंतवणूक वाढविण्यावर टीका करणाऱ्या गटाने, परदेशांमधील कंपन्या कामगारविषयक कायदे आणि वेतन यासंबंधीचे नियम पाळतील किंवा कसे अशी शंका उपस्थित केली होती. पण या अभ्यासातून नेमके उलट आढळले. म्हणजे, परकीय कंपन्या कामगारविषयक कायदे पाळण्याची शक्यता अधिक आहे. शिवाय त्याच क्षेत्रातील इतर स्थानिक कंपन्यांच्या तुलनेत त्या वेतनही चांगले देतात. गुंतवणुकदारांना नवीन बाजारपेठ हवी आहे की त्यांना उत्पादन खर्चात घट करायची आहे यावर, परकीय गुंतवणुकीचा विविध देशांवर वेगवेगळा

परिणाम होत असतो, असेही लक्षात आले आहे. ज्या कंपन्यांना उत्पादन परिव्यय कमी करायचा आहे, म्हणजे वाढत्या कार्यक्षमतेला प्राधान्य द्यायचे आहे त्या कंपन्या उत्पादकता, प्रत्यक्ष उत्पादन, रोजगार आणि स्थानिक नागरिकांचे दैनंदिन जीवनमान या सर्व बाबींमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारची परकीय गुंतवणूक ही स्थानिक उद्योगासाठी आव्हानाची परिस्थिती निर्माण करीत नाही; उलट, ती स्थानिक वितरक व पुरवठादार यांचीच मदत घेते. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील या गटाचाही फायदाच होतो.

स्थानिक कंपन्या परकीय कंपन्यांच्या उत्पादनांची नक्कल करून त्याआधारेही स्थानिक बाजारपेठ मिळविण्याचे प्रयत्न करू शकतात. चीनमधील स्थानिक बाजारपेठेच्या गरजा अशा प्रकारे स्थानिक उद्योगांनी पूर्ण केल्याची उदाहरणे आहेत. यासंदर्भात भारतातील संगणक क्षेत्रातील कंपन्यानी केलेली प्रगतीही बोलकी आहे. काही परकीय कंपन्या गुंतवणूक केलेल्या देशातील स्थानिक बाजारपेठ मिळविण्याचा प्रयत्न करतात तेव्हा रोजगारावर संमिश्र परिणाम होतो, आणि जास्त कार्यक्षम नसणाऱ्या कंपन्याही कधी कधी पुढे येतात. वॉल मार्टने मेक्सिकन खाद्यान्नाच्या क्षेत्रात प्रवेश केला तेव्हा असे घडले होते.

परकीय गुंतवणूक वाढल्यामुळे स्थानिक नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावल्याचे आढळते, पण हा मुद्दा क्वचितच चर्चिला जातो. बाजारपेठेत परकीय गुंतवणूक झाल्यानंतर उत्पादनाचा दर्जा वाढतो, किंमती कमी होतात आणि ग्राहकांना उत्पादनांच्या निवडीतही वाव मिळतो. कारण, परकीय कंपन्यांच्या प्रवेशामुळे नवे भांडवल, नवे तंत्रज्ञान आणि व्यवस्थापकीय कौशल्ये यांचाही देशात प्रवेश होतो. त्यामुळे स्थानिक कंपन्यांना आपला वरील सर्व बाबींमधील दर्जा सुधारावा लागतो आणि किंवा त्यांना बाजारपेठेतून बाहेर पडण्याचा मार्ग स्वीकारावा लागतो. काही कंपन्यांचे यात नुकसान होत असले तरी किंमती कमी झाल्याने व निवडीला वाव मिळाल्याने ग्राहकांचा फायदा होतो. कधी कधी कमी किंमतींमुळे उत्पादनाची मागणी वाढून उद्योग भरभराटीला येण्याची शक्यताही वाढते.

ज्या कंपन्यांना बाजारपेठ मिळवायची असते अशा दहा कंपन्यांपैकी सात कंपन्यांच्या उत्पादनांच्या किंमती कमी झाल्याचे या अभ्यासात आढळले. तसेच उत्पादनांच्या निवडीतही ग्राहकांना वाव मिळाला, मात्र बँकिंगच्या क्षेत्रात असे घडलें नाही. काही उत्पादनांच्या किंमतीत लक्षणीय घट झाल्याचे आढळले. उदाहरणार्थ,

चीनमध्ये, १९९५ ते २००१ या काळात मोटारींच्या किंमती ३० टक्क्यांनी कमी झाल्या, मात्र याच काळात इतर काही उत्पादनांच्या किंमती १० टक्क्यांनी वाढल्या. एकूण कामांच्या व उत्पादनांच्या संदर्भात कार्यक्षमता वाढविण्याचे ज्या कंपन्यांचे उद्दिष्ट असते, त्या कंपन्यांमुळे संबंधित देशावर लक्षणीय परिणाम दिसून येत नाही. कारण, अशा कंपन्यांचे उत्पादन हे निर्यातीसाठी साहाय्यभूत ठरत असते आणि त्याचा फायदा जागतिक पातळीवरील ग्राहकांना होत असतो. तरीदेखील अशी काही उदाहरणे आहेत की जेथे परकीय गुंतवणूक करण्यात आल्याने संबंधित देशांमधील ग्राहकांचा काही ना काही प्रकारे फायदा झालेला आहे. मेक्सिकोच्या वाहन उद्योगात परकीय गुंतवणूकदारांनी वित्तपुरवठा करण्याबाबात काही नवे मार्ग सुचविल्याने तेथील उद्योगांना त्याचा उपयोग झाला. अप्रत्यक्षरित्या विविध क्षेत्रांत उत्पादकता आणि उत्पादन वाढल्याने उद्योगांचा फायदा झालाच, तसेच त्यांच्या पुरवठादारांची मिळकत वाढल्याने एकूण राष्ट्रीय उत्पन्नातही वाढ झाली. यावरून असे दिसते की काही उद्योग वा क्षेत्रे वगळता इतर बहुतांश क्षेत्रांमध्ये परकीय गुंतवणूक वाढल्याने संबंधित देशाच्या अर्थव्यवस्थेचा फायदाच झालेला आहे.

## सवलतींचे धोरण कितपत योग्य ?

परकीय गुंतवणुकीचे विविध फायदे लक्षात आल्याने अनेक देशांमधील सरकारे करात कपात, आयात शुल्कात सवलती, कमी दरात जमीन व ऊर्जा आणि इतर सोयी -सुविधा उपलब्ध करून देऊन आपापल्या देशांतील परकीय गुंतवणूक वाढविण्याचा प्रयत्न करीत असतात. आयोवा, न्यूजर्सी पासून ब्राझील व भारतापर्यंत हे प्रयत्न झाल्याचे दिसत असले तरी मॅककिन्सीच्या अभ्यासात मात्र सरकारचे हे असे प्रयत्न महाग व पुरेशा प्रमाणात परिणामकारक ठरत नसल्याचे आढळले.

सरकारची ही धोरणे आपल्याला परकीय गुंतवणुकीसाठी फारशी महत्त्वाची वाट नाहीत, असे परकीय कंपन्यांमधील अधिकाऱ्यांनी मुलाखतीदरम्यान स्पष्ट केले आहे. उलट, अशा सवलतींपेक्षा पायाभूत सोयी सुविधा सरकारने उपलब्ध करून दिल्या पाहिजेत, असेही या अधिकाऱ्यांनी सांगितले. उदाहरणार्थ, भारत सरकारने माहिती तंत्रज्ञान व संगणक क्षेत्राशी संबंधित विविध प्रकारचे काम भारतातून करवून घेण्याचे ठरवितील त्या कंपन्यांना, नफ्यावर ३५ टक्के कर सवलत देण्याचे जाहीर केले आहे. (फिलिपिन्सनेही अशा प्रकारचे धोरण आखले आहे.) कंपन्यांच्या आर्थिक उलाढालीचा विचार करता, या कंपन्यांसाठी ही काही फारशी आकर्षक सवलत ठरली

नाही. भारतासारख्या देशात काही उद्योग जेव्हा नवे असतात व बाजारपेठेत स्थिरावण्याचा प्रयत्न करीत असतात तेव्हा, त्यांना कदाचित अशा सवलतींचा उपयोग होऊ शकतो. पण भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योग चांगलाच स्थिरावला आहे. जागतिक बाजारपेठेतील एक चतुर्थांश बाजारपेठ भारतातील संगणकक्षेत्राच्या हातात असताना अशा सवलतींची गरज नाही.

सवलती देण्याचा फायदा कधी कधी होऊही शकतो; पण याचवेळी एक लक्षात घेतले पाहिजे की, त्याचे काही वेगळे परिणामही होऊ शकतात. अशा सवलती स्थानिक उद्योगांनाही देण्याची वेळ येऊ शकते आणि सरकारने तसे केल्यास, सरकारचा खर्च वाढूही शकतो. तसेच भरघोस सवलतींमुळे फार मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होण्याची शक्यता असते. ब्राझीलच्या वाहन उद्योगाबाबत असे घडले होते. त्यामुळे गरजेपेक्षा जास्त उत्पादन होऊन ते कटकटीचे ठरू शकते.

परकीय कंपन्यांची गुंतवणूक ही उपयोगाची ठरत असली तरी अनेक देशांमध्ये स्थानिक उद्योगांना संरक्षण देण्याचा प्रयत्न सरकारतर्फे नेहमीच करण्यात येतो, असेही आढळले. म्हणजे, एकीकडे, परकीय कंपन्यांना प्रवेश द्यायचा आणि दुसरीकडे त्यांनी त्यांच्या उद्योगविषयक गरजा - सुटे भाग इत्यादी, हे स्थानिक उद्योगांकडून विकत घेतले पाहिजे, ('लोकल कन्टेन्ट रिक्वायरमेंट' - LCRs) हे त्यांना बंधनकारक करायचे. कधी कधी यामुळे दर्जाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे म्हटले जाते. तर कधी कधी हे करणे बंधनकारक नसतानाही उद्योगांनी तसे करणे उपयोगाचे ठरत असल्यामुळे सुटे भाग वा तत्सम वस्तू या स्थानिक उद्योगांकडून विकत घेण्याचा निर्णय घेतला जातो, असेही या अभ्यासातून स्पष्ट झाले. भारत व चीन येथे स्थानिक उद्योगांकडून सुटे भाग घेतल्यानंतर मोटार बनविणे थोडे महाग झाल्याचे आढळले. 'जॉईंट व्हेंचर' हा प्रकार खूप फायद्याचा ठरतो असे या अभ्यासातून आढळले नाही.

## धोरणकर्त्यांनी काय करायला हवे ?

या अभ्यासाच्या शेवटी 'मॅककिन्सी'ने धोरणकर्त्यांसाठी काही सूचना केल्या आहेत. परकीय गुंतवणुकीचे जास्तीत जास्त फायदे मिळविण्यासाठी संबंधित देशांमधील धोरणकर्त्यांनी सवलती व नियमनांच्या मार्गापेक्षा वेगळा मार्ग चोखाळायला हवा. देशांतर्गत अर्थव्यवस्था बळकट करणे आणि स्पर्धात्मक बाजारपेठेला चालना देणे हे मार्ग जास्त उपयोगाचे ठरू शकतात. ब्राझीलने १९९४ नंतर अर्थव्यवस्था स्थिर राहावी यासाठी प्रयत्न केले, तेव्हाच त्या देशातील परकीय गुंतवणूक वाढली, असे उदाहरणादाखल

म्हणण्यात आले आहे. स्पर्धात्मक बाजारपेठेमुळे परकीय गुंतवणुकीचे फायदे जास्त प्रमाणात होऊशकतात, अन्यथा उत्पादकता वाढण्यासाठी वा स्थानिक उद्योगांची कार्यक्षमता वाढण्यासाठी त्याचा फारसा उपयोग होणार नाही.

'मॅककिन्सी'ने असेही म्हटले आहे की, परकीय गुंतवणूक फक्त एकाच ठिकाणी अयशस्वी झाल्याचे आढळले. ते म्हणजे ब्राझीलमधील बँकिंग क्षेत्र होय. त्याचे एक कारण म्हणजे, स्पर्धा कमी होती; आणि असे झाले कारण तेथील ग्राहकांना बँक बदलणे शक्य झाले नाही. परकीय गुंतवणुकीचा सर्वात जास्त फायदा भारतातील मोटार, वाहन उद्योगाला आणि चीनमधील इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाला झाला, असेही या अभ्यासाने स्पष्ट केले आहे.

'मॅककिन्सी'ने शेवटी असा निष्कर्ष काढला आहे की, परकीय गुंतवणुकीचे जास्तीत जास्त फायदे मिळविण्यासाठी त्यासंबंधीची नियंत्रणे कमी करणे, स्पर्धात्मक बाजारपेठ वाढविणे, आयातीवरील निर्बंध कमी कमी करत नेणे आणि नवीन उद्योग चालू करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल असे आर्थिक -औद्योगिक वातावरण व सुविधा निर्माण करणे हे विकसनशील देशांनी करायला हवे.

आज, जागतिकीकरणाला मोठ्या प्रमाणावर विरोध होत आहे. जागतिकीकरणामुळे गरिबीचे प्रमाण कमी होईल व सामान्य नागरिकांचे राहणीमान सुधारेल, यावर अनेजण शंका व्यक्त करीत आहेत. पण या अभ्यासातून असे खरेच घडू शकते, असे लक्षात आले आहे. तेव्हा विकसनशील देशांनी परकीय गुंतवणुकीपासून चार हात दूर राहण्यापेक्षा परकीय गुंतवणुकीशी हस्तांदोलन करावे व त्यापासून जास्तीत जास्त फायदे मिळविण्यासाठी धोरणांमध्ये बदल घडवून आणावेत, अशा सूचना 'मॅककिन्सी'ने केल्या आहेत.

*(संदर्भ - इंटरनेट, 'इंटरनॅशनल इकॉनॉमी पब्लिकेशन्स', 'मॅककिन्सी ग्लोबल इन्स्टिट्यूट' च्या संचालिका डायना फॅरेल यांचा लेख)*

*माहिती तंत्रज्ञानाधारित विविध सेवांचे जाळे ग्रामीण भागात पसरले जाऊन त्याचा लाभ ग्रामीण भारतातील नागरिकांनाही घेता यावा, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. ग्रामीण भागाच्या विकासाचा अभ्यास करणारे किमान ५० तज्ज्ञ यासाठी एकत्र आले आहेत. 'नॅशनल अलायन्स फॉर इन्फर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजीज फॉर बेसिक ह्युमन नीडस्' यांच्या पुढाकाराने ही योजना राबविण्यात येणार आहे.*

औद्योगिक

# अमेरिका: 'वॉल मार्ट'च्या विरोधात स्त्री कर्मचाऱ्यांचा लढा

अमेरिकेत, औद्योगिक क्षेत्रात एक नवे वादळ निर्माण झाले आहे. 'चेन स्टोअर्स'च्या (एकाच दुकानाच्या विविध गावी शाखा असणे) उद्योगात आघाडीवर असलेली आणि खाजगी क्षेत्रात सर्वात मोठी समजली जाणारी 'वॉलमार्ट' ही कंपनी कायद्याच्या कचाट्यात अडकली आहे. स्त्री कर्मचाऱ्यांना दुय्यम दर्जाचा पगार व वागणूक देण्यावरून या दुकानांमध्ये काम करणाऱ्या स्त्रियांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठवला असून अमेरिकेच्या कायद्याच्या इतिहासात, नागरी हक्कांच्या संदर्भात हा सर्वात मोठा खटला ठरतो आहे. अमेरिका, लॅटिन अमेरिका, युरोप आणि आशिया अशा विविध ठिकाणी 'वॉलमार्ट'ची एकूण ३५०० दुकाने असून १० लाखावर कर्मचारी तेथे नोकरी करतात. यातील स्त्री कर्मचाऱ्यांची संख्या ७० टक्क्यांपेक्षा जास्त आहे.

किरकोळ विक्रीच्या (retail) माध्यमातून गेल्या वर्षात, २५६ बिलियन अमेरिकन डॉलर्स एवढी प्रचंड विक्री आणि त्यातून ९ बिलियन अमेरिकन डॉलर्स एवढा मोठा नफा मिळविणाऱ्या 'वॉलमार्ट'ला न्यायालयीन खर्चाची व तो हरल्यास कर्मचाऱ्यांना द्यावा लागणाऱ्या नुकसान भरपाईची काळजी जास्त वाटत नाही; तर, बाजारपेठेतील आपली प्रतिमा व प्रतिष्ठा डागाळली जाण्याची काळजी जास्त वाटते आहे. सॅनफ्रान्सिस्को येथील फेडरल कोर्टाच्या न्यायाधीशांनी हा खटला दाखल करून तो चालविण्याची परवानगी दिली आहे. 'वॉलमार्ट'च्या आजी आणि माजी स्त्री कर्मचाऱ्यांना या खटल्यात सहभागी होता येणार आहे. म्हणजे एका प्रकारे हा सामूहिक खटला ठरणार आहे. या खटल्याची तारीख निश्चित करण्यात आलेली नाही. सर्वप्रथम 'वॉलमार्ट' विरूद्ध सहा स्त्रियांनी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. पुरुष कर्मचाऱ्यांच्या तुलनेत स्त्री कर्मचाऱ्यांना कमी पगार देण्यात येतो; तसेच त्यांचा पदोन्नतीचा हक्कही डावलला जातो, असे त्यांनी नमूद केले होते. 'वॉलमार्ट'मधील सर्वच स्त्रियांना या खटल्यात सहभागी होऊ द्यावे किंवा नाही याचा निर्णय देण्यासाठी न्यायालयाने नऊ महिने विचार केला.

न्यायालयाच्या या निर्णयाविरूद्ध 'वॉलमार्ट' दाद मागणार आहे. त्यांच्या मते 'वॉलमार्ट'चे विविध शहरांमधील स्थानिक व्यवस्थापन यासंबंधीचा निर्णय घेते, त्यामुळे प्रत्येक ठिकाणी वेगळे खटले चालविले जाणे सयुक्तिक ठरेल. असे असले तरी न्यायाधीश मार्टिन जेन्किन्स यांच्या मते व्यापार -उद्योगात असे निर्णय वा कार्यसंस्कृती ही वरपासून खालपर्यंत झिरपत गेलेली असते. या त्यांच्या निर्णयामुळे 'वॉलमार्ट'चा खटला अनेक वर्षे चालून प्रसिद्धीमाध्यमांना भरपूर खाद्य मिळू शकते. यामुळे 'वॉलमार्ट'च्या विक्रीवर विपरित परिणाम होऊ शकतो, म्हणून त्यांना हे सर्व टाळायचे आहे.

या प्रकरणात असेही म्हटले गेले आहे की, 'वॉलमार्ट'ने आपली विक्री वाढविताना ग्राहकांना कमी किंमतीत माल मिळेल, अशी व्यवस्था केली. यामुळे आपले नुकसान भरून काढण्यासाठी 'वॉलमार्ट'ने कमी पगार तर दिलेच; शिवाय बेकायदेशीररित्या अमेरिकेत स्थलांतर केलेल्या अनेकांना नोकऱ्या दिल्या. त्यामुळे 'वॉलमार्ट'चा पगारावरील खर्च वाचला. कर्मचाऱ्यांना जास्त वेळ काम केल्याचा मोबदला दिला नाही आणि जास्तीत जास्त स्त्री कर्मचाऱ्यांना नोकरीवर ठेवून त्यांच्याकडूनही कमी पगारावर काम करून घेतले. 'वॉलमार्ट'ने आपल्यावरील आरोप फेटाळले आहेत आणि ज्या अनेक स्त्री कर्मचाऱ्यांना पुरुषांच्या बरोबरीने पगार देण्यात आले आहेत व ज्यांना पदोन्नती देण्यात आली आहे, त्यांचा विचार खटल्यात करण्यात आलेला नाही, असेही म्हटले आहे. 'वॉलमार्ट'ने आपल्या दुकानांमधील विविध वस्तूंच्या किंमती कमी केल्याने एक परिणाम असा झाला की, इतर स्थानिक दुकानांनाही आपल्या दुकानातील वस्तूंच्या किंमती कमी कराव्या लागल्या.

यापूर्वी १९९७ मध्ये 'वॉलमार्ट'ने आपल्यावरील असाच एक खटला न्यायालयाबाहेर मिटविला होता. तेव्हा नुकसान भरपाईपोटी २५ हजार स्त्रियांसाठी १० कोटी ४ लाख अमेरिकन डॉलर्स 'वॉलमार्ट'ला द्यावे लागले होते. आता त्यांना नुकसान भरपाईपोटी फार मोठी किंमत मोजावी लागेल असे दिसते.

या प्रकरणी एका नियतकालिकात म्हणण्यात आले आहे की, जागतिकीकरण व खाजगीकरणाचे समर्थन करणाऱ्या आणि स्पर्धात्मक बाजारपेठेला प्रोत्साहन देणाऱ्या अमेरिकेत असे घडू लागले तर, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अमेरिकेची काय किंमत राहील ? आंतरराष्ट्रीय बाजारावर व गुंतवणुकीवर त्याचा विपरित परिणाम होणार नाही काय ? *(संदर्भ - इंटरनेट, इकॉनॉमिस्ट - २६ जून २००४)* ■■

सामाजिक

# कुपोषण, गरिबी आणि शिक्षण

दारिद्र्य, मरण यातुनी मरण बरे बा दरिद्रता खोटी।
मरणात दुःख थोडे, दारिद्र्यात व्यथा असे मोठी ।।

असे 'दारिद्र्या' विषयीचे मतप्रदर्शन एका जुन्या कवीने नोंदवून ठेवले आहे. दारिद्र्याच्या व्यथा काहीजण भोगतात आणि काहींना त्या पाहून, ऐकून वा वाचून माहिती असतात. त्यामुळे त्यांविषयी सर्वसामान्यपणे माहिती लोकांना असते असे म्हणता येईल. पण काही नवी माहिती आता पुढे येतेय.

बालमृत्यूंचे थैमानही आपल्या ओळखीचे आहे. कुपोषण हे त्याचे एक मोठे कारण आहे, हेही आता ठळकपणे जगासमोर आले आहे. दारिद्र्यामुळे कुपोषण आणि कुपोषणामुळे बालमृत्यू अशी एक मालिका सांगता येते. पण, आता असेही दिसून आले आहे की दारिद्र्यामुळे कुपोषणाची समस्या जशी निर्माण होते तशीच कुपोषणामुळे दारिद्र्याची समस्याही उद्भवते. असा दारिद्र्य आणि कुपोषण यांचा परस्पर संबंध आहे.

कुपोषण ही गोष्ट मोठी गंभीर आहे. तिचा केवळ आरोग्याशीच संबंध नाही तर शिक्षणाशीही आहे, बुद्धीच्या विकासाशी आहे, मेंदूमधील न्यूरॉन्स पेशींच्या बांधणीशी आहे, हे आता स्पष्ट होत आहे. त्यामुळे कुपोषणाचा प्रश्न हा केवळ बालकांवर तात्कालिक उपचार करण्याचा प्रश्न मानता येत नाही तर तो त्यांच्या बौद्धिक, शैक्षणिक आणि म्हणून व्यावसायिक जीवनावर कायमचा परिणाम करणारा, घातक परिणाम करणारा असा प्रश्न आहे, हे लक्षात घ्यावे लागते.

आज जगात सुमारे ८० कोटी लोक 'भुकेले' आहेत. त्यांना पुरेसे आणि पुरेसे पोषक अन्न मिळत नाही. पुरेसे पोषण होत नसल्यामुळे ते शरीराने दुबळे असतात. त्यांची शारीरिक वाढ व्हावी तशी होत नाही नि मनानेही ते असावे तेवढे तजेलदार असत नाहीत. अशी दुहेरी दुर्बलता असलेल्यांची श्रमिक म्हणून असलेली उत्पादकताही कमी असते आणि मग, श्रमबाजारात त्यांच्या श्रमांची किंमत कमी राहते, लोकं गरीब राहतात. त्यामुळे, गरिबीमुळे कुपोषण आणि कुपोषणामुळे गरिबी असे दुष्टचक्र अस्तित्वात येते.

या परिस्थितीला आणखीही एक घटक कारणीभूत आहे. तो म्हणजे शिक्षणाचा. कुपोषित मुलांच्या शिक्षणात अडथळे खूप. अशी मुले कदाचित शाळेतच जात नाहीत; गेलीच तर टिकत नाहीत आणि टिकलीच तर तर नीट शिकतही नाहीत. भूक अभ्यासावर लक्ष केंद्रित करू देत नाही, आणि मग असं काही गंभीर चित्र डोळ्यांसमोर उभं राहतं की, अतिशय गरीब राष्ट्रांमधील लोक बुद्धिमत्तेच्या बाबतीत कमी पडतात.

याची उलट बाजू अशी की, पोटभर नि पौष्टिक अन्न मिळाले तर संततीचा बुद्धिविकास चांगला होतो. मुले शाळेत जातात, त्यांचे अभ्यासाकडे मन केंद्रित होते. मुले शिकतात, आणि पुढे आणखी चांगल्या जीवनाची आशा करू शकतात.

पुरेशा नि पोषक अन्नामुळे मेंदूचेही पोषण चांगले होते. अल्पवयात बालकांच्या मेंदूची बांधणी होत असते. या काळात मेंदूच्या निरोगी वाढीसाठी पोषक अन्नाची तसेच बौद्धिक सरावाचीही गरज असते. परंतु, याच वयात मुलांना अन्नाकरवी कमी उष्मांक, कमी प्रथिने आणि इतर लहान-सहान अन्नद्रव्ये अपुऱ्या प्रमाणात मिळाली तर त्यांची शारीरिक आणि बौद्धिक वाढही खुंटण्याची शक्यता असते.

पोषणाचे जागतिक चित्र तसे बरे आहे. कारण, अन्नसेवनाबाबतची स्थिती पूर्वीपेक्षा बरी आहे. औद्योगिक क्रांतीच्या काळाच्या तुलनेत आजचा माणूस पन्नास टक्क्यांनी अधिक मोठा आहे, असे म्हणतात. कित्येक श्रीमंत देशांमधून आणि इतर देशांमधील श्रीमंत वर्गांमधून, नवी पिढी जुन्या पिढीपेक्षा उंचीला कितीतरी अधिक आहे. कारण, तीनशे वर्षांपूर्वी कुपोषण हे सार्वत्रिक होते, आता श्रीमंत देशांमधून ते जवळजवळ नाहीसे झाले आहे.

विकसनशील देशांमध्येही अन्नाची परिस्थिती पूर्वीपेक्षा सुधारलेली आहे, असे म्हणता येईल. विकसनशील जगामधील टोकाचे कुपोषण असलेल्या पाच वर्षांच्या आतील बालकांची संख्या, गेल्या शतकाच्या अखेरच्या दशकात म्हणजे १९९० ते २००० या दशकात ३९ टक्क्यांवरून ३० टक्क्यांपर्यंत खाली आली असल्याची, जागतिक आरोग्य संघटनेची माहिती आहे. २००५ सालापर्यंत ही संख्या २६ टक्क्यांपर्यंत खाली येईल असा त्यांचा अंदाज आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न व शेती संघटनेच्या अंदाजानुसार १९९० च्या सुमारास, या देशांमध्ये १८ टक्के लोक कुपोषित होते ती संख्या दहा वर्षांत अगदी अल्पप्रमाणात का होईना, घटली आहे. ती १७ टक्क्यांवर उतरली आहे. तरीही अर्थात, कुपोषित लोकांची निव्वळ संख्या मात्र, या कालावधीत ७८.० कोटींवरून ७९ कोटीपर्यंत वाढली आहे. कुपोषित मुलांच्या आकडेवारीत जी

काही सुधारणा झाली आहे, ती चीन आणि काही प्रमाणात भारत या दोन देशांमधील आर्थिक विकासाचा परिपाक आहे. तरीदेखील सर्वात जास्त कुपोषित बालकांची संख्या मात्र आशिया खंडातीलच आहे.

आफ्रिकेतील परिस्थिती जरा गंभीर आहे. तेथील एक तृतियांश लोक कुपोषित आहेत, आणि यात मागील दशकात फारशी काही सुधारणा झालेली नाही. उलट, मध्य आफ्रिकेत, कांगो युद्धामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली असून १९९५ ते २००१ या कालावधीत, उपासमार होणाऱ्या लोकांच्या संख्येत ५३ टक्क्यांवरून ५८ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. मात्र, आफ्रिकेमधील तुलनेने शांतता असलेल्या म्हणजे नायजेरिया, अंगोला, घाना, मलावी आणि मादागास्कर या देशांत कुपोषणाबाबतची परिस्थिती सुधारली आहे.

कुपोषण हा आजारपणाला कारणीभूत ठरणारा सर्वात मोठा घटक आहे, असे राष्ट्रसंघाच्या पोषणविषयक समितीचे म्हणणे आहे. मुख्य म्हणजे, उपासमारीने रोगप्रतिकारक शक्तीच कमी होते. शिवाय आजारामुळे खाण्यावरची इच्छा उडून कुपोषण आणखीनच वाढते नि रक्तप्रवाहात पोषकद्रव्ये मिसळण्यालाच अडथळा निर्माण होतो. जगातल्या एकूण आजारांपैकी ९.५ टक्के आजार हे मातांचे नि लहान बालकांचे कुपोषण, यांमुळे उद्‌भवतात. जन्माच्या वेळी कमी वजन असलेल्या मुलांना हिवताप, हगवण यांची लागण चटकन होते; आणि अनेकांचे त्यांत मृत्यू ओढवतात. दरसाल एक कोटी मुले अल्पवयातच मृत्यूला कवटाळतात आणि यांपैकी निम्मे मृत्यू प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कुपोषणामुळे होतात. अलीकडे एडस् या रोगाचा नि कुपोषणाचा संबंधही लक्षात आला आहे. या रोगाची बाधा झालेल्यांमध्ये, जे कुपोषित असतात त्यांचा रोग फार वेगाने बळावतो. दुसराही एक संबंध आढळतो. उपासमार होणाऱ्या स्त्रिया अन्नासाठी शरीरविक्रयाचा आसरा घेतात.

कुपोषण हे मूलतः ज्याला 'प्रथिन -ऊर्जा कमतरता' असे म्हणतात, त्याने अस्तित्वात येते. कर्बोदके, फॅटस् आणि प्रथिने यांच्या कमतरतेमुळे अशी ऊर्जा कमतरता निर्माण होत असते. यातूनच इतर काही खनिजे, उदाहरणार्थ, लोह, तांबे किंवा आयोडिन, अ-जीवनसत्व यांचीही कमतरता निर्माण होते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, अशा अगदी छोट्या छोट्या पोषणद्रव्यांच्या घटकांची कमतरता हे आरोग्याला घातक ठरणाऱ्या पहिल्या दहा घटकांमध्ये येते. आयोडिनचा आवश्यकतेपेक्षा कमी उपभोग जगातील दोन अब्ज लोक घेतात; कारण, ते लोक वास्तव्य करतात

तेथील पाणी किंवा जमीन यांमध्येच आयोडिनचे प्रमाण फारसे नसते. गळ्यावर येणारी गॉईटरची गाठ हे या कमतरतेचे एक लक्षण असते. पण एवढेच नाही. आयोडिनची गरज मेंदूच्या विकासासाठीही असते. राष्ट्रसंघाच्या पाहणीनुसार दरवर्षी सुमारे दोन कोटी मुले मानसिकदृष्ट्या अपंग निपजतात; आणि याचे कारण म्हणजे, त्यांच्या आयांच्या अन्नात पुरेसे आयोडिन नसते. याचे बालकांच्या पुढील वाढीवरही अनिष्ट परिणाम दिसून येतात. शारीरिक खुजेपण वा मतिमंदता या बालकांमध्ये दिसून येते. अत्यल्प खर्चाने आयोडिनची कमतरता घालवता येते; आणि ती आयोडिनयुक्त मीठाकरवी. अनेक राष्ट्रांनी या दिशेने प्रयत्न केल्यामुळे २० टक्क्यांपासून ६० टक्क्यांपर्यंत आयोडिनयुक्त मीठाचा उपयोग, गेल्या दहा वर्षांमध्ये केला गेला आहे.

आयोडिनप्रमाणेच लोहाचेही अत्यल्प प्रमाण कुपोषणात आढळून येते आणि त्याचेही शारीरिक आणि बौद्धिक विकासावर घातक परिणाम दिसून येतात. लोहाची कमतरता तशी सार्वत्रिकच आहे. सुमारे ४ ते ५ अब्ज लोकांच्या बाबतीत ही कमतरता दिसून येते. याचे परिणाम उत्पादकतेच्या संदर्भात सांगायचे तर असे म्हणता येईल की अनेक देशांमध्ये राष्ट्रीय उत्पन्नाच्या २ टक्के उत्पन्नाची घट ही या कारणाने होते. बांगलादेशामध्ये हे प्रमाण ७.९ टक्के इतके मोठे असल्याचे निदान वॉशिंग्टनच्या 'ॲकेडमी ऑफ एज्युकेशनल डिव्हलपमेंट'च्या जय रॉस आणि 'टोरांटो युनिव्हर्सिटी'च्या स्यू हॉर्टन या संशोधकांनी केले आहे. लोहाच्या कमतरतेचे बौद्धिक विकासावर होणारे परिणामही असेच व्यापक आहेत. विकसनशील देशांमधील ४० ते ६० टक्के मुलांबाबत हे परिणाम दिसून येतात. नेविन क्रीम शॉ या न्यू हॅंपशायर येथील 'युनायटेड नेशन्स युनिव्हर्सिटी'मधील आहारतज्ज्ञाच्या मते, लोहाच्या कमतरतेचा बुद्धिमत्तेवर होणारा अनिष्ट परिणाम हा ५ ते १० इतक्या बुध्यांकाइतका असतो. अलीकडे, जसे आयोडिनयुक्त मीठाकरवी तसे लोह पीठाकरवी देण्याचा प्रयत्न होतो आहे. लोहयुक्त गोळ्यांचाही वापर केला जातो. अ-जीवनसत्व, जस्त यांचीही कमतरता अशीच लहान मुलांच्या आरोग्यावर घातक परिणाम करीत असते. थोडक्यात, असे म्हणता येईल की, उपासमार आणि खनिजांची कमतरता यांमुळे अधिक दुर्बल, आजारांना बळी पडणारे आणि कमी बुद्धिमान असे लोक निर्माण होतात. आणि मग हेच त्यांच्या गरिबीचे कारण ठरते. त्यांची उत्पादकता कमी असते, त्यांची उत्पन्ने साहजिकच कमी असतात आणि म्हणून ते गरीबच राहतात. अशा प्रकारे कुपोषण हा दारिद्र्याचा परिणाम न ठरता, कारणच ठरते.

कित्येकदा कुपोषणाचे लहान वयात होणारे शारीरिक व बौद्धिक परिणाम हे कायमस्वरूपी असतात. विशेषतः अगदी गर्भामध्ये आणि वयाच्या पहिल्या दोन वर्षांमध्ये होणाऱ्या कुपोषणाबद्दल हे अधिक खरे आहे. त्यामुळे या कालावधीत बालकांची पोषणयुक्त अन्नाची गरज पुरविण्याची नितांत गरज आहे. स्तनपान हा यावरचा उत्तम उपाय आहे. असा अंदाज केला जातो की बालकाला पहिल्या सहा महिन्यात केवळ स्तनपान आणि त्यानंतर आणखी पाच-सहा महिने प्रामुख्याने स्तनपान करविल्यास जगातील बालमृत्यूचे प्रमाण १३ टक्क्यांनी कमी होईल; तेरा लाख मुलांना दरसाल जीवदान मिळेल.

केवळ स्तनपानाच्या महत्त्वाबद्दलच नव्हे तर एकूणच स्त्रियांचे शिक्षण हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. जितक्या अधिक मुली शाळांमध्ये जाऊ लागतील तितके सार्वत्रिक कुपोषणाचे असणारे परिणाम घटतील. याबाबतचा एक अभ्यास उपलब्ध आहे. लिझा स्मिथ व लॉरेन्स हडदाद ही दोघे 'इंटरनॅशनल फूड पॉलिसी रिसर्च इन्स्टिट्यूट' या अमेरिकेतील संस्थेत संशोधन करतात. यांनी ६३ देशांचा अभ्यास करून असे अनुमान काढले आहे की, पुरुषांच्या तुलनेत, स्त्रियांचे शिक्षण आणि आयुर्मान यांत झालेली सुधारणा यांमुळे १९७० ते १९९५ या कालावधीमध्ये कुपोषित मुलांचे प्रमाण ५ (की ५०) टक्क्यांनी घटू शकले आहे.

मुलींना जीवनोपयोगी शिक्षण देणे हा कितीतरी राष्ट्रीय संकटे टाळण्याचा प्रभावी उपाय आहे.

(संदर्भ - 'फूड फॉर थॉट' , हा 'द इकॉनॉमिस्ट', ३१ जुलै २००४ मधील लेख)

## कुपोषण व दारिद्र्य

दुष्काळाच्या बातम्यांना (वृत्तपत्राच्या पहिल्या पानांवर) ठळक प्रसिद्धी मिळते. अधिक व्यापक असूनही कुपोषण दुर्लक्षिले जाते. खरे तर हा खूपच गंभीर आणि पसरलेला प्रश्न आहे. काही देशांमधून तर जवळजवळ निम्म्या मुलांची वाढ कुपोषणाने खुंटते आहे. अशावेळी त्यांना उत्पादक कसे बनविले जाणार आहे ?


अशी राष्ट्रे हा कुपोषणाचा प्रश्न सोडविल्याशिवाय आपला दारिद्र्याचा प्रश्न खचितच सोडवू शकणार नाहीत.

*(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट, ३१ जुलै २००४)*

सामाजिक

# कंबोडिया: वाढता इस्लाम व दहशतवाद

भारताच्या पूर्वेला, थायलंडचा व व्हिएटनामचा शेजारी असलेला आणि अहिंसेची शिकवण देणाऱ्या गौतम बुद्धाच्या विचारसरणीला प्राधान्य देणारा कंबोडिया, हा गरीब गटामध्ये मोडणारा देश. (खालील नकाशा पाहावा) तरीही मध्यंतरी, ख्मेर राजवटीत सुमारे तीन दशके, या देशाने हिंसक नागरी युद्ध अनुभवले. नागरी युद्धाने ग्रस्त व त्रस्त असलेल्या या देशाने जगाच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान मिळविले नव्हते. सध्या मात्र येथे आंतरराष्ट्रीय राजकारणाशी संबंधित एका वेगळ्याच प्रश्नाने डोके वर काढले आहे. आतापर्यंत बौद्ध विचारसरणी व इस्लाम यांचा मेळ घालत उदरनिर्वाह करणाऱ्या येथील चाम मुस्लिम नागरिकांमध्ये, कट्टर धार्मिकता वाढीस लागली असून, तेथे आंतरराष्ट्रीय पातळीवरील दहशतवाद्यांना पाठिंबा मिळतो आहे, असे आढळले आहे.




कंबोडियाच्या एकूण लोकसंख्येच्या फक्त ५ टक्के नागरिक (अंदाजे ७ लाख) हे चाम मुस्लिम आहेत. आपल्याला ख्मेर राजवटीने चांगली वागणूक दिली नाही, असे त्यांना नेहमीच वाटत आले आहे. १९७० नंतर तेथील रक्तरंजित नागरी युद्धांच्या काळात या समाजाची स्थिती आणखीनच वाईट झाली. १९९० च्या दशकाच्या

सुरूवातीच्या काळात, येथील मशिदींची संख्याही रोडावली. तेव्हा तेथे २० मशिदीं होत्या, आता तेथे नव्या काही मशिदी (व मदरसेदेखील) उभ्या राहताहेत. अमेरिकेवर ११ सप्टेंबर २००१ रोजी झालेल्या हल्ल्यानंतर, कंबोडियात बहुसंख्य असलेल्या ख्मेरांनी चाम मुस्लिमांकडे संशयाने बघायला सुरूवात केली. या नागरिकांना पोलिसांकडून व प्रशासनाकडून येणाऱ्या तक्रारींना सतत उत्तरे द्यावी लागत होती. तेव्हा कंबोडियाच्या सरकारकडून त्यांना पुरेशी आर्थिक व इतर प्रकारची मदतही मिळत नव्हती. दरम्यान, जगभरातील मुस्लिम नागरिकांमध्ये पुराणमतवादी मुस्लिम व नवविचार समजून घेणारे मवाळ मुस्लिम असे दोन गट उभे राहताना दिसत होते, तसेच येथेही घडले. सरकारी राजवटीचे बळी ठरलेले आणि इस्लामची कास धरणारे चाम मुस्लिम आणखी कट्टरतेकडे झुकले. त्यांना मलेशिया, इंडोनेशिया, सौदी अरेबिया व इतर काही देशांमधील मुस्लिम नागरिकांकडून आर्थिक मदत मिळू लागली.

चाम समाजाचा अभ्यास करणारे नॉर्वे येथील अभ्यासक बिजोन बेस्ली यांच्या मते, परदेशांतील आर्थिक मदत वाढल्याने येथील समाजाचे बौद्ध व इस्लामचा मेळ घातलेले सामाजिक व धार्मिक जीवन बदलले आणि पुराणमतवादी मुस्लिमांकडील त्यांचा ओढा वाढू लागला. काही मुस्लिम नागरिक मात्र आपल्याच समाजातील या घडामोडींकडे संशयाने पाहात होते. परदेशांमधील मुस्लिम नागरिकांकडून पितृत्व नसलेल्या परदेशांतील मुस्लिम मुलांना, कंबोडियातील मदरशांमध्ये शिकण्यासाठी पाठविले जात आहे, असे त्यांना वाटत होते. पाश्चात्य देशांतील सरकारेही त्यांच्या या मताशी सहमत होती पण ती वेगळ्या कारणाने. पाश्चात्य देशांना असे वाटत होते की कंबोडिया हा अतिरेक्यांचे आश्रयस्थान किंवा हल्ला करण्याचे स्थान ठरू शकेल.

चाम मुस्लिम नागरिकांचे जीवन आता बदलत चालले आहे. येथील मुस्लिम मुली शाळेत जाताना शाळेचा गणवेश घालतात, मात्र घरी परतल्यानंतर पुन्हा इतर कामासाठी घराबाहेर जाताना नखशिखांत बुरखा घालून जातात. हा पोशाख त्यांना मलेशिया, इंडोनेशिया या देशांमधील मुस्लिम संघटनांकडून मिळतो. अलीकडे, मदरशांमधील शिक्षणाचे प्रमाण वाढत असून ही तेथील प्रशासनाची डोकेदुखी झाली आहे. कारण, मदरशांमधून ख्मेर प्रशासनाने ठरविलेले विविध विषय वा अभ्यासक्रम शिकविले जात नाहीत. काही चाम मुस्लिम मदरशांमधील शिक्षणाबाबतही चिंता व्यक्त करतात. चाम समाजाचे अभ्यासक बिजोन बेस्ली यांची काळजी अशी आहे की, मदरशांमधील चाम मुस्लिम मुलांना चाम समाजाबद्दलची माहिती देण्यात येत

नाही व ख्मेर भाषाही तेथे शिकविली जात नाही. शिकून घरी आलेला मुलगा आपल्या घरच्यांशी संवाद साधू शकला नाही तर तो आपल्या घरी रुळणार तरी कसा ? आणि मग आपल्या समाजात काम तरी कोणते करणार ?

मशिदीत प्रार्थना करण्यावरूनही तेथे गोंधळ निर्माण होतो आहे. परदेशांमधील मशिदींमध्ये जशी प्रार्थना केली जाते तशीच प्रार्थना येथील मशिदींमध्ये केली जावी असे एका गटाला वाटते. तर दुसऱ्या गटाला चाम समाजाच्या परंपरेप्रमाणे प्रार्थना करावी असे वाटते. या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी इस्लामचे कंबोडियातील ज्येष्ठ नेते मुफ्ती सोस काम्री यांना मध्यस्थी करावी लागली. त्यांनी असे म्हटले आहे की, एकाच प्रकारे प्रार्थना केली जावी, पण यावरील वाद संपलेला नाही. काही मशिदींमध्ये दोन्ही प्रकारे प्रार्थना करण्यात यावी यासाठी मशिदीअंतर्गतच दोन विभाग करण्यात येत आहेत किंवा काही ठिकाणी नव्या मशिदी बांधण्यात येत आहेत.

चाम मुस्लिमांच्या या घडामोडींबाबत ख्मेर प्रशासन लक्ष ठेवून आहे. या प्रशासनाच्या कानावर अशीही चर्चा आली आहे की, चाम मुस्लिमांना कंबोडियातून वेगळे व्हायचे आहे आणि व्हिएटनामच्या दक्षिण भागातील चंपा या त्यांच्या मूळ प्रदेशात विलीन व्हायचे आहे.

चाम मुस्लिमांच्या उद्दिष्टांवर शंका घेता येईल अशी एक घटना घडल्याने येथील ख्मेर प्रशासन आणखीनच त्रस्त झाले आहे. इंडोनेशियातील बाली येथे बॉंबस्फोट घडवून आणणारा (या स्फोटात २०० नागरिक ठार झाले होते.) मुस्लिम दहशतवादी हंबाली याने २००२ व २००३ या काळात, कंबोडिया येथे वास्तव्य केले होते, हे प्रशासनाला कळल्याने त्यांची अस्वस्थता वाढली आहे. दरम्यान, कंबोडियात इस्लामचा वाढता प्रभाव हा अमेरिकेसाठीही काळजीचा विषय ठरल्याने कंबोडियातील अमेरिकेच्या दूतावासाने अमेरिकेतील मुस्लिम नागरिकांच्या जीवनाची माहिती देणारे एक विशेष मासिकही प्रसिद्ध केले. पण ते ख्मेर भाषेतून असल्याने पुराणमतवादी चाम मुस्लिमांचा प्रभाव असलेल्या खेड्यांमधील नागरिकांना समजले असण्याची शक्यता कमीच आहे. शिवाय जे चाम मुस्लिम ख्मेर व कंबोडियाला मानतात, त्यांच्यावर उपाशी राहण्याची वेळ येते; तर, परदेशांमधील मुस्लिम नागरिकांची मदत घेणाऱ्या चाम मुस्लिमांची आर्थिक स्थिती सुधारून ते कट्टर मुस्लिम बनत जातात व या गोष्टींकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे येथील मुस्लिमांचा प्रश्न हा एक काळजीचा विषय ठरू लागला आहे.

*(संदर्भ - फार इस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू २९ जुलै २००४)* ■■

आर्थिक

# आशिया: रोजगारनिर्मितीचे आव्हान

इफझल अली हे एशियन डिव्लपमेंट बँकेत प्रमुख अर्थतज्ज्ञ आहेत. 'फार इस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू' या मासिकात (१५ जुलै २००४) त्यांनी आशियामधील रोजगारनिर्मितीच्या आव्हानाविषयीचा एक टिपणवजा छोटेखानी लेख लिहिला आहे.

जगातल्या इतर कोणत्याही प्रदेशांपेक्षा विकसनशील आशियाचा विकास अधिक वेगाने होत आहे. किंबहुना म्हणूनच त्या अनुषंगाने जे संरचनात्मक बदल होताहेत त्यातून श्रमप्रधान शेतीकडून अन्य क्षेत्रांकडे साधनस्रोत वळत आहेत. या घटनेबरोबरच, वाढती लोकसंख्या विचारात घेतली तर आशियापुढे रोजगारनिर्मितीबाबतची एक प्रकारची आणीबाणीची परिस्थिती येत्या एक - दोन दशकांमध्ये अपेक्षित आहे, असे इफजल अली यांचे म्हणणे आहे.

आत्ताच्या आशियामधील परिस्थितीतून असे दिसून येत आहे की, वाढत्या विकासदरांच्या बरोबरीने बेकारांच्या संख्येत मात्र घट झालेली नाही. चीन, भारत, पाकिस्तान, इंडोनेशिया, फिलिपिन्स अशा राष्ट्रांमधून बेकारीच्या प्रमाणात अपेक्षित अशी घट आढळून येत नाही. उलट अनेक देशांमधून श्रमशक्तीच्या संख्येत मात्र वाढ होत आहे. उदाहरणार्थ, २००० ते २०१० या काळात, बांगलादेश, फिलिपिन्स, मलेशिया, इंडोनेशिया, पाकिस्तान वगैरे राष्ट्रांमधून दरसाल दोन टक्क्यांनी श्रमसंख्या वाढण्याची शक्यता आहे. भारत नि चीन हे तर मुळातच मोठ्या लोकसंख्येचे देश. त्यामुळे येथे मोठ्या संख्येने तरूण वर्ग श्रमसंख्येत समाविष्ट होत असतो. पुढील दशकात चीनमध्ये ६० लाख तर भारतात १ कोटी लोक रोजगार मागणाऱ्यांच्या यादीत जाऊन पडणार आहेत.

या अपेक्षित परिस्थितीची काही ठळक कारणे आहेत. अनेक विकसनशील देशांमध्ये अलीकडे जो विकासदर वाढताना दिसतो आहे, तो प्रामुख्याने, भांडवलप्रधान उद्योग, कुशल श्रमप्रधान असे निर्यातउद्योग आणि मालमत्तेचे क्षेत्र यांमध्ये वाढलेला आहे. मात्र, त्यामानाने श्रमप्रधान अशी शेतीउद्योगाची प्रगती झालेली नाही. उलट, शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा घटून तो उद्योग व सेवाक्षेत्राकडे गेला आहे. पण, त्या

मानाने श्रमशक्तीचे मात्र विभाजन झालेले नाही. परिणामत: शेतीक्षेत्रात अतिरिक्त श्रम साचताहेत आणि विकसनशील देशांचे हेच क्षेत्र अजून मोठे आहे. दुसऱ्या दिशेला, ज्या उद्योग - सेवा क्षेत्रांतून उत्पन्ननिर्मिती वाढते आहे त्या क्षेत्रांमधून त्याच्या बरोबरीने रोजगार मात्र वाढत जात नाहीये. त्यामुळे रोजगारनिर्मितीसाठी त्या क्षेत्रांवर अपेक्षांचा भार टाकणे सयुक्तिक दिसत नाही. भारतात आजघडीला सेवाक्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ५० टक्के आहे, पण रोजगारवाढ ही उत्पादनवाढीच्या मागेच पडत आहे.

लोकसंख्यावाढ ही या प्रश्नामध्ये भरच घालणारी आहे. आशियामध्ये आजच १५ ते २४ या वयोगटातील लोकांची संख्या ६६ कोटी इतकी आहे आणि २०१० पर्यंत ही संख्या ७३ कोटींवर पोचेल. एवढ्या लोकांना नव्याने रोजगार पुरविण्याची गंभीर समस्या आशियाखंडासमोर आहे. त्यातच रचनात्मक बदलांमुळे ज्यांचे रोजगार जातील त्यांनाही पर्यायी काही देण्याची वेगळी जबाबदारी आहेच. इफजल अली यांच्या मते, यावरचा प्रमुख उपाय आहे तो श्रमप्रधान गुंतवणूकीतून शेतीक्षेत्रात सुधारणा करण्याच आणि त्यायोगे या क्षेत्रामध्ये अधिक रोजगारनिर्मिती करण्याचा. उदाहरणार्थ, लहान प्रमाणावर पाणीपुरवठा योजनांकरवी नवी कामे निर्माण होऊ शकतील, त्याकरवी पुढे अधिक शेतीकामे निघून अधिक लोकांना त्यात सामावून घेतले जाईल. अनेक शेतकऱ्यांना आज प्रत्यक्ष बाजारपेठेपर्यंत पोचता येत नाही. रस्ते, वाहतुकीच्या सोयीच पुरेशा नाहीत. त्यांची पूर्ती करणे हेच लहान -लहान अशा अनेक रोजगारांच्या निर्मितीचे क्षेत्र बनू शकते; शिवाय उत्पन्नवाढीचा तो मार्गही ठरू शकतो. आणखी एक शक्यता आहे. ग्रामीण भागांतून खाजगी गुंतवणुकीलाही बऱ्यापैकी प्रोत्साहन मिळू शकेल. रोजगारनिर्मिती याही दिशेने होऊ शकेल.

भूमी, श्रम, भांडवल या उत्पादनाच्या घटकांना, मुक्त बाजारपेठेत लवचिक आणि स्पर्धात्मक वातावरण मिळणे, हे रोजगारवाढीसाठी आवश्यक असते. शेतीक्षेत्रांतील सुधारणांमधून भूमीबाजारपेठेत असे वातावरण तयार होईल. आणि श्रमबाजारात असे वातावरण कायदे - नियमांच्या आधारे निर्माण करावे लागेल. भांडवलाबाबतही किंमती आणि विभाजन यासंदर्भात योग्य अशी धोरणे ठरवावी लागतील. अशा प्रकारे तीनही उत्पादन घटकांकडे रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने पाहून, बदलत्या परिस्थितीत रोजगारवाढीची आशा, इफजल अली व्यक्त करतात. एकीकडे, बाजारविषयक सुधारणांना गती देत असतानाच, दुसरीकडे, मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणे, ती अधिक कार्यक्षम बनविणे, उत्पादक बनविणे या गोष्टींवर रोजगाराचे क्षेत्र अवलंबून आहे. इफजल अली यांच्या

मते, उद्योगांबाबत मुक्त प्रवेशाचे नि मुक्त निर्गमनाचे वातावरण ठेवून बाजारपेठ अधिक कार्यक्षम करणे, नव्या प्रदेशांमधून मूलभूत सोयी - सुविधा उभारणे, आणि मुख्य म्हणजे योग्य अशी शासकीय धोरणे आणि भ्रष्टाचाराला तिलांजली या साऱ्यांची गरज आहे. यांबाबतची धोरणे राबविताना रोजगार प्रधान विकासाचा हेतू ठेवला पाहिजे. तरच पुढील काळातील बदलत्या परिस्थितीत लोकांना विकासाबरोबर कामही मिळेल; आणि विकासाचे फायदेही लोकांना मिळतील. ■■

## अर्थतज्ज्ञ, अथेन्स आणि पदकांची संख्या

ऑलिम्पिक स्पर्धांचा व अर्थतज्ज्ञांचा काय संबंध आहे, असा प्रश्न कुणाला पडणे स्वाभाविक आहे. आर्थिकवाढीचे दर, विनिमय दर आणि इतर आर्थिक बाबींच्या आशा -निराशेच्या चक्रात अडकून बसलेले अर्थतज्ज्ञ क्रीडाक्षेत्रातील विविध देशांच्या कामगिरीवर बोलणार तरी काय ? मात्र अर्थतज्ज्ञ याही क्षेत्रात मागे नाहीत हे, अँड्र्यू बर्नाड (टक स्कूल ऑफ बिझिनेस) आणि मेहन बुस्स (हास स्कूल ऑफ बिझिनेस) यांनी दाखवून दिले आहे. सिडनी येथे चार वर्षांपूर्वी झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये अमेरिकेचे ॲथलिटस् किती पदके जिंकतील व अमेरिकेला किती सुवर्णपदके मिळतील याबद्दलचा अंदाज त्यांनी वर्तविला होता आणि तो खराही ठरला. याहीवेळेस अमेरिका ९३ पदके जिंकणार असा त्यांचा अंदाज असून, त्यांनी तो प्रसिद्धही केला आहे. हा अंदाज व्यक्त करण्यासाठी त्यांनी आर्थिक आकडेवारीचा - देशाची लोकसंख्या व श्रीमंती यांचा, उपयोग केला आहे. जास्त लोकसंख्या म्हणजे पदके मिळण्याची शक्यता जास्त, तसेच जास्त श्रीमंती म्हणजे खेळाडूंना प्रशिक्षण व इतर सुविधा मिळण्याची शक्यता जास्त, हे त्यांचे साधे गणित आहे. ज्या देशात या क्रीडास्पर्धा भरविल्या जातात, तेथील नागरिकांचा आपल्या देशाला असलेला पाठिंबा याचाही पदके मिळविण्यावर परिणाम होतो, असे त्यांना वाटते. त्यामुळे चार वर्षांपूर्वी झालेल्या स्पर्धांच्या तुलनेत यंदा ग्रीसला मिळणाऱ्या पदकांच्या संख्येत किमान दुपटीने वाढ होण्याचा त्यांचा अंदाज आहे. श्रीमंत व गरीब यांच्यातील दरी वाढते आहे असे म्हटले जात असले तरी ऑलिम्पिक खेळांच्या बाबतीत ते खरे नाही. गेल्या ४० वर्षांपासून श्रीमंत राष्ट्रांना मिळणाऱ्या पदकांच्या संख्येत सतत घट झाली आहे. गरीब राष्ट्रांना मिळणाऱ्या पदकांच्या संख्येत दोन कारणांमुळे वाढ झाली आहे. एक, ते अधिक श्रीमंत होत आहेत; तर दोन, तेथील लोकसंख्या वेगाने वाढते आहे. अर्थतज्ज्ञांचे अंदाज खरे ठरो वा न ठरो, पण अर्थतज्ज्ञ जिंकणारच, कारण त्यांच्यावर टीका करणाऱ्यांना ते एवढे तरी दाखवू शकतात की आर्थिक क्षेत्र (व अर्थतज्ज्ञही!) गंमतीचे आहे. *(द इकॉनॉमिस्ट, १४ ऑगस्ट २००४)*

औद्योगिक

# पाण्यातील कचऱ्यातून औद्योगिक उत्पादन

शेतात वाढणारे तण हे पिकांसाठी अडचणीचे (व शेतकऱ्यांसाठी डोकेदुखीचे) ठरत असते. त्याप्रमाणे पाण्यात वाढणाऱ्या विविध प्रकारच्या वनस्पती यादेखील तळ्यातील नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहासाठी अडचणीच्या ठरू शकतात. कानफुटी (Hyacinth) ही अशीच एक पाणवनस्पती आहे. या पाणवनस्पतीमुळे पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण कमी होते, (काहींच्या मते या वनस्पतीमुळे पाणी नैसर्गिकरित्या शुद्धही होत असते !) आणि पाण्यातील आम्लता (Acidity) वाढते, असे अभ्यासकांना आढळले आहे. मासेमारी करणाऱ्यांना याचा त्रास होतो, तसेच विपुलतेने वाढणाऱ्या या वनस्पती सभोवतालच्या जैवविविधतेलाही हानी पोचवीत असतात. यावर एक चांगला उपाय संशोधकांनी शोधला आहे. या वनस्पतीपासून विविध उद्योगांना लागणारे सेल्युलेज (cellulase) तयार करता येऊ शकते हे त्यांनी सिद्ध केले आहे. नागपूर येथील 'नॅशनल एन्व्हायर्नमेंटल इंजिनियरिंग रिसर्च इन्स्टिट्यूट' (NEERI) यांनी हे सेल्यूलेज तयार करण्याचे तंत्रज्ञान १९९६ मध्येच विकसित केले आहे. या संस्थेने 'केरळ ब्युरो ऑफ इंडस्ट्रीयल प्रमोशन'च्या (K-BIP) विनंतीवरून, प्रयोगादाखल केरळमध्ये यासाठी लागणारा प्रकल्प उभा करण्याचे मान्य केले आहे. यासाठी केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाची मदतही घेतली आहे.

हे संशोधन व हा प्रकल्प औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचा ठरणार आहे. कारण, भारतात सेल्युलेजची आयात मोठ्या प्रमाणावर होते आणि बरेचसे परकीय चलन त्यासाठी खर्च होते. सेल्यूलेजचा वापर सेल्यूलोजचे (cellulose) / फळांच्या रसांमधील घटकांचे विघटन करण्यासाठी, सुती कपड्यांमधील तलमपणा वाढवून त्यांचा दर्जा वाढविण्यासाठी आणि पेपर उद्योगात पेपरचा ताण वा चिवटपणा वाढविण्यासाठी तसेच प्राण्यांना देण्यात येणारी खाद्यान्ने तयार करण्याच्या उद्योगातही करण्यात येतो. सेल्यूलेजची जागतिक पातळीवरील बाजारपेठ ५० कोटी अमेरिकन डॉलर्स एवढी मोठी आहे. सेल्यूलेजचा वापर हा औद्योगिक क्षेत्रांतील एक स्वस्त घटक प्रदार्थ म्हणून होणार असला तरी त्याचे दुहेरी फायदे आहेत.

नद्या, तळी व डबकी यांच्यामध्ये विपुल प्रमाणावर व नैसर्गिकरित्या तयार होणारी ही वनस्पती पाण्याचा साठा मर्यादित करते. कानफुटी (Hyacinth) या प्रकारातील एका वनस्पतीपासून फक्त ५० दिवसात त्या जातीसारख्याच तीन हजार वनस्पती तयार होतात. साधारण पाणवनस्पती जेवढे पाणी वापरतात त्यापेक्षा तेरा पट जास्त पाणी या वनस्पतींकडून वापरले जाते. पाण्यापासून ऊर्जानिर्मिती करण्यास आणि पिण्याचे स्वच्छ पाणी मिळण्यातही या वनस्पतींच्या विपुल वाढीमुळे अडथळा निर्माण होतो. त्यामुळे या पाणकचऱ्याचा उपयोग औद्योगिकदृष्टीने करून त्यापासून पैसा मिळविता आला तर ग्रामीण भागातील रोजगाराच्या संदर्भातही ते खूप महत्त्वाचे ठरणार आहे.

## सेल्यूलेजची निर्मिती

या वनस्पतीपासून सेल्यूलेजची निर्मिती करण्याची प्रक्रिया साधी आहे. या पाणवनस्पतीची पाने व मुळे यांच्यावर आंबविण्याची वा फसफसण्याची (Fermentation) प्रक्रिया करण्यात येऊन त्यांचा गर काढण्यात येतो. हा गर अर्धवट सुकला की त्याला ओव्हनमध्ये गरम करण्यात येते. मग तो पाण्याबरोबर मिसळून त्याचे जरासे पातळसर मिश्रण तयार करण्यात येते. त्यावर काही प्रक्रिया करून तो दहा दिवस विशिष्ट वातावरणात ठेवण्यात येतो. त्यानंतर ॲसिटोन किंवा कॅल्शियम क्लोराईड ही रसायने वापरून त्यातून सेल्यूलेज बाहेर काढण्यात येते. या पाणवनस्पतीच्या मुळांचा उपयोग गांडूळखत तयार करण्यासाठी किंवा बायोगॅस तयार करण्यासाठीही करण्यात येतो. केरळमध्ये हा प्रकल्प उभा करण्यासाठी अंदाजे १३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे आणि तो प्रकल्प नीट चालविण्यासाठी दरवर्षी साडेचार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. तरीदेखील या तंत्रज्ञानाचे फायदे लक्षात घेता हा खर्च अवाजवी ठरणार नाही असे संबंधितांचे म्हणणे आहे.

दरम्यान, केरळमधील स्व -साहाय्य गटाच्या महिलांनी हीच वनस्पती वापरून पिशव्या, चटया, सतरंज्या अशा काही वस्तू तयार केल्या असून त्यांच्या या वस्तूंना थायलंडसारख्या काही देशांमध्ये भरपूर मागणी आहे. अतिशय सोप्या पद्धतीने म्हणजे, ही पाणवनस्पती पाण्याबाहेर काढून ती पाण्यात २० मिनिटे उकळवून व १० ते १५ दिवस वाळवून मग त्यावर दाब देऊन ती विणण्यायोग्य करून त्यांनी या वस्तू तयार करण्यासाठी त्याचा उपयोग केला आहे. त्यांना बराच फायदा यातून झाला आहे.

*(संदर्भ - डाऊन टू अर्थ, १५ जुलै २००४)* ■■



# शांततेच्या पाऊलखुणा

## शतकांपूर्वीच स्त्रिया ‘शांतते’साठी क्रियाशील

अलीकडच्या काळात, ‘युद्ध आणि शांतता’ या विषयाला बरेच महत्त्व मिळाले आहे. त्यातही, शांततेच्या संदर्भातील स्त्रियांचे सध्याचे कार्य म्हणजे, स्त्री-मुक्ती चळवळीचा (१९७० नंतरचा), तो एक परिणाम आहे, असे साधारणतः गृहित धरले जात आहे; पण तसे नाही. युद्धाला विरोध करून, शांततेसाठी स्त्रियांनी प्रयत्न केल्याचे ऐतिहासिक घडामोडींवरून दिसून येते. इसवीसन १४०८ मध्ये, इटलीतील कवयित्री ख्रिस्टीन द पिसान यांनी, त्या काळात सुमारे शतकभर चालू असलेल्या युद्धविषयक घडामोडींवर कडक टीका केली होती, आणि युद्ध ही जागतिक पातळीवर एक शोकांतिका आहे, असे म्हटले होते. शस्त्रांनी केलेले नुकसान कधीच भरून काढता येत नाही; याच्या तुलनेत अशी कोणतीच गोष्ट नाही की, ज्यात झालेली चूक दुरुस्त करता येत नाही, म्हणून मानवी जीवनात सर्वात महत्त्वाची गोष्ट ‘समज’ किंवा ‘शहाणपण’ (Wisdom) ही आहे, असे त्यांनी स्पष्ट केले होते. मग, फ्रेंच राज्यक्रांतीनंतर (इसवीसन १७८९) स्त्रियांचे राजकीय, सामाजिक व आर्थिक हक्क यांच्याबद्दलच्या मागण्या पुढे आल्या. स्त्रियांकडून यासंदर्भात होणारी निदर्शने वाढली आणि युद्धे संपविण्याबाबतही त्या बोलू लागल्या.

यानंतरच्या काळात, ब्रिटन व अमेरिका येथे गुलामगिरी नष्ट करण्याबाबत स्त्रियांनी मोठ्या प्रमाणावर आवाज उठविला आणि या घटनेनंतर खरे तर त्यांचे संघटन व कृतीशीलता यांचा प्रत्यय त्यांना व इतरांना आला. यापूर्वी इसवीसन १६६० च्या काळात, क्वेकर समाजाने सामाजिक शांततेसाठी काही प्रयत्न केले होते. स्त्री-पुरुष समानता त्यांनी महत्त्वाची मानली होती. याचा पुरस्कार करणाऱ्या एलिझाबेथ फ्राय यांचे कार्य यासंदर्भात उल्लेखनीय ठरले होते. एकोणिसाव्या शतकात, शांततावादी गटाला समाजातील अनेक स्त्री-पुरुषांकडून पाठिंबा मिळाला होता. शांततेसाठी प्रयत्न करणारा पहिला समाजगट इसवीसन १८१५ मध्ये, अमेरिकेत, स्थानिक पातळीवर उभा राहिला होता. १८१६ मध्ये, ब्रिटनमध्ये, क्वेकर गटातर्फे ‘शांतता समाजा’ची (Peace

Society) स्थापना करण्यात आली होती. या गटातील स्त्रियांची संख्या अंदाजे १० टक्के होती, पण पुरुष सदस्यांकडून त्यांचा सहभाग फारसा वाढू देण्यात आला नाही. दरम्यान, ब्रिटनमध्ये इसवीसन १८३३ मध्ये गुलामगिरी नष्ट करण्याबाबतचा कायदा मंजूर करण्यात आला, तोपर्यंत अनेक स्त्रिया शेतकऱ्यांच्या हिताच्या असलेल्या 'अँटी कॉर्न लॉ'च्या प्रचारात सहभागी झाल्या होत्या. म्हणजे चळवळीत उतरण्याचा अनुभव त्या घेतच होत्या. रिचर्ड कॉबडेनने खुल्या व्यापारासाठी सुरू केलेले हे आंदोलन आणि अशा इतर काही घटना जगाला लोकशाहीकडे घेऊन जात होत्या; त्याला स्त्रियांनी मोठ्या प्रमाणावर मान्यता दिली, असाच अर्थ स्त्रियांच्या वाढत्या सहभागातून निघत होता. १८५० च्या काळात शांतता समाजाचे कार्य केवळ ब्रिटनमध्येच नव्हे तर युरोपमध्येही स्थिरावले होते आणि त्यातून स्त्रियांचा एक गट 'ऑलिव्ह लीफ सर्कल्स' या नावाने उभा राहिला होता. शांततेच्या कार्यासाठी निधी जमविण्याचे काम या गटाने केले होते. तथापि स्त्रियांचे कार्य फक्त इतपतच मर्यादित राहावे किंवा स्त्रियांच्या क्षमतांचा वापर फक्त निधी गोळा करण्यासाठी केला जावा, यावर ॲनी नाईट सारख्या काही स्त्रियांनी आक्षेपही घेतला होता.

यानंतरच्या काळात शांततेसाठी आणखी व्यापक प्रयत्न करण्यात येऊ लागले. पीस काँग्रेसच्या सभा आता नियमितपणे होऊ लागल्या होत्या. अशा प्रयत्नांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढावा, हे १८५१ च्या सुमारास सर्वमान्य होऊ लागले होते. काँग्रेसच्या, लंडन येथे होणाऱ्या मोठ्या परिषदेसाठी स्त्रियांच्या प्रतिनिधींनी देखील उपस्थित राहावे असे ठरले आणि ॲनी नाईट यांची निवडही त्यासाठी करण्यात आली, पण हे प्रत्यक्षात घडले नाही.

शांततेचे प्रयत्न चालू असतानाच काही राष्ट्रांमध्ये युद्धाच्या शक्यता दृष्टिपथात येत होत्या. युद्ध टाळण्यासाठी रशियातील झार राजवटीपुढे ब्रिटिशांमधील क्वेकर गटाने शांततेचे प्रस्ताव मांडले होते, पण हे प्रयत्न अयशस्वी झाल्याने ब्रिटनने रशियाविरूद्ध युद्ध पुकारले. त्यावेळी स्वीडनमधील कादंबरीकार व शांततावादी गटाच्या सदस्या फ्रेडरिका ब्रेमेर यांनी सर्व ख्रिश्चन स्त्रियांना आवाहन केले होते की, 'येशू ख्रिस्ताने दाखविलेल्या प्रेमाच्या मार्गाचा अवलंब करून युद्धाच्या विरोधात एकत्र या !' या काळातही समाजातील अनेकांचे असे म्हणणे होते की, स्त्रियांनी संघर्षाच्या बाबींमध्ये लक्ष घालू नये. पण स्त्रियांमध्ये युद्धाच्या विरोधात बोलण्याचे धाडस हळूहळू येत होतेच. युद्ध आणि त्यामुळे निर्माण झालेले विविध प्रश्न हे समाजात

सर्वांपर्यंत विशेषतः स्त्रियांपर्यंत पोचले होते. अनेक स्त्रिया युद्धाचा विविध बाजूंनी विचार करू लागल्या होत्या. यातीलच एक होती फ्लोरेन्स नाईटिंगेल. युद्धाच्या इतिहासात उल्लेखनीय ठरलेले हे नाव. युद्धात जखमी झालेल्यांवर तातडीने योग्य ते औषधोपचार व्हावेत यासाठी तिने जोमाने व विविध पातळ्यांवर प्रयत्न केले. जणू जखमी सैनिकांचा आवाज हा फ्लोरेन्स नाईटिंगेल यांचाच आवाज होता. त्याचे फळ म्हणजे १८६४ मध्ये यासंबंधीचा जिनिव्हा करार मंजूर करण्यात आला.

ब्रिटन व अमेरिका येथील स्त्रियांच्या चळवळींमधून स्त्रियांमध्येच दोन गट उभे राहिले. एक गट स्त्रीच्या मातृत्वाच्या नैसर्गिक भूमिकेला आणि तिच्या कौटुंबिक जबाबदारीला महत्त्व देणारा होता; तर दुसरा गट तिने राजकीय, सामाजिक व आर्थिक अधिकार मिळवून पुरु षांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रांत पुढे यावे, असे मानणारा होता. १८६७ मध्ये शांततेसाठी झालेल्या एका आंतरराष्ट्रीय परिषदेत स्वीडनमधील स्त्रीवादी कार्यकर्त्या मॅरी गोएग या उपस्थित राहिल्या होत्या. १८५४ मध्ये ब्रेमेर यांनी मांडलेले विचार पुढे नेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आणि शांततेसाठी स्त्रियांची आंतरराष्ट्रीय संस्थाही त्यांनी स्थापन केली. पण १८७०-७१ मध्ये झालेल्या फ्रँको - प्रशियन युद्धामुळे शांततेचे हे प्रयत्न त्यांना आणखी पुढे नेता आले नाहीत. या घडामोडींचा खोल परिणाम अमेरिकेच्या जुलिया वार्ड होवे ('बॅटल हिम ऑफ द रिपब्लिक' हे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध आहे) यांच्यावर झाला आणि त्यांनी देखील स्त्रियांनी शांततेसाठी प्रयत्न करावे असे आवाहन आंतरराष्ट्रीय पातळीवर केले आणि ख्रिश्चन धर्मातील तत्त्वांवर आधारित 'इंटरनॅशनल पीस असोसिएशन' स्थापन केली. १८७४ मध्ये 'लेडीज पीस असोसिएशन' स्थापन करण्यात आली.

## शांततेच्या नोबेलची सुरूवात

पाश्चात्य देशांतील या घडामोडींनी परमोच्च टोक गाठले गेले ते नोबेल पुरस्कारात शांततेच्या नोबेलचा समावेश झाला (१९०१) तेव्हा. ऑस्ट्रियाच्या शांततावादी कार्यकर्त्या व कादंबरीकार बर्था वोन सटनर (यांचे 'ले डाऊन युवर आर्म्स' हे पुस्तक प्रसिद्ध आहे) यांनी आल्फ्रेड नोबेल यांचे सचिव म्हणून काही काळ काम केले होते. त्यांची व नोबेल यांची चांगली मैत्री होती. बर्था सटनर यांनी आपल्या मैत्रीचा हक्क बजावून आल्फ्रेड नोबेल यांना पटवून दिले की नोबेल पुरस्कार देताना शांततेसाठी देखील नोबेल पुरस्कार असणे हे अत्यावश्यक आहे. बर्था वोन सटनर यांचे वैयक्तिक मत असे होते की, कोणत्याही समाजाचा विकास हा सांस्कृतिक विकासावर व

त्यासंबंधीच्या विविध यशांवर अवलबून असतो. लष्करी किंवा भौगोलिक विकास हा सामाजिक प्रगतीचा निकष ठरू शकत नाही. आपल्या पुस्तकात त्यांनी हेच प्रतिपादन केले होते की युद्धांना पूर्णविराम देण्यासाठी सतत वाटाघाटी व चर्चा यांची गरज आहे. सटनर यांचे 'ले डाऊन युवर आर्म्स' या पुस्तकाने विक्रमी विक्री केली, त्याच्या जर्मन भाषेत ३७ आवृत्त्या निघाल्या आणि सोळा भाषांमध्ये त्याचा अनुवाद झाला. लिओ टॉलस्टॉय देखील या पुस्तकाने प्रभावीत झाले होते. त्यांनी म्हटले होते की, "गुलामगिरी नष्ट करण्यासाठी मिसेस बीचर स्टो यांचे पुस्तक कारणीभूत ठरले होते, त्याप्रमाणे सटनर यांचे हे पुस्तक जगातील युद्धे नष्ट होण्यासाठी कारणीभूत ठरावे."

सटनर यांच्या पुस्तकानंतर अनेक जण प्रभावीत झाले आणि शांततेसाठी अनेक संघटना स्थापन होऊ लागल्या. १८९१ मध्ये 'ऑस्ट्रियन सोसायटी ऑफ पीस लव्हर्स,' १८९५ मध्ये 'अँग्लो-फ्रेंच युनियन इंटरनॅशनल' आणि १८९६ मध्ये शस्त्रास्त्रप्रसार रोखण्यासाठी 'अलायन्स युनिव्हर्सल' अशा काही संघटना उल्लेखनीय आहेत. या व अशा काही संघटनांना समाजातील नवमतवादी व मध्यमवर्गाने उचलून धरले. समाजातील नैतिकता व मूल्ये टिकविण्यासाठीदेखील त्यांना या संघटना महत्त्वाच्या वाटू लागल्या होत्या.

बर्था वोन सटनर यांनी युरोप व अमेरिकेचा दौरा केला आणि शांततेसाठी अनेकांचे मन वळविले पण त्यांचे कार्य पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या धुरात विरून गेले. इतके की त्यांना १९०५ मध्ये शांततेचे नोबेल मिळाले होते, हे देखील विस्मृतीत गेले. मृत्यूसमयीदेखील बर्था सटनर यांचे शब्द होते, 'ले डाऊन युवर आर्म्स अँड टेल धिस टू मेनी.' ('तुमची शस्त्रे खाली ठेवा व हे इतर अनेकांनाही सांगा') सटनर यांच्या मृत्यूनंतरही काही स्त्रिया शांततेचे कार्य पुढे नेत होत्या. १९१४ मध्ये ब्रिटनमध्ये असाच गट उभा राहिला होता. 'नो कॉन्सक्रिप्शन फेलोशिप'ची स्थापनाही करण्यात आली होती. कॅथरीन मार्शल यांच्या विनंतीवरून बर्ट्रांड रसेल यांनी त्याचे अध्यक्षपद स्वीकारले होते. शांततेच्या कार्यातील स्त्रियांचा सहभाग हा ब्रिटन व अमेरिकेपुरताच मर्यादित राहिला नव्हता. आता तो युरोपमधील इतर देशांमध्ये पोचला होता. १९१५ मध्ये झालेल्या एका आंतरराष्ट्रीय परिषदेत १२ देशांमधील स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. शतकांपूर्वी चालू झालेले स्त्रियांचे शांततेचे कार्य आजही अनेक देशांमध्ये चालू आहे.

*(इंटरनेट - 'हिस्ट्री टुडे,' हेलेन रॅपपोर्ट यांचा लेख. 'ॲन एन्सायक्लोपिडिया ऑफ विमेन सोशल रिफॉर्मर्स' याच्या त्या लेखिका आहेत.)*

# जगाच्या पाठीवर...

(अंत्यसंस्कार)

## जपान: 'अंत्यसंस्कार उद्योग'

जगाच्या पाठीवरील कोणत्याही देशातील कोणत्याही समाजात, अंत्यसंस्कार हा रूढी-परंपरेने चालत आलेला, भावनेचा ओलावा असलेला आणि धार्मिक वा आध्यात्मिक विषयात मोडणारा प्रकार आहे. धर्म - संस्कृतीप्रमाणे त्याचे प्रकार बदलत गेले असले तरी त्यातील गांभीर्याचा सूर लोपलेला नाही.

बौद्ध परंपरेला धरून असलेला जपानमधील अंत्यसंस्कार हा असाच एक गंभीर कार्यक्रम आहे; मात्र तो बराच खर्चिकही आहे. तेथे बौद्ध परंपरेप्रमाणे क्रियाकर्म करताना दोन मोठे समारंभ करण्यात येतात. त्यासाठी लागणारी जागा, फुले इ., तसेच पाहुण्यांसाठी भेटवस्तू, बौद्ध भिक्खूंकडून करण्यात येणारी प्रार्थना या व इतर बाबींवरील असा सगळा खर्च ३० हजार अमेरिकन डॉलर्स (अंदाजे तेरा ते पंधरा लाख रुपये) एवढाही येऊ शकतो. (साधी राहणी व उच्च विचारसरणीचे तत्त्वज्ञान शिकविणाऱ्या बौद्ध धर्मात असा हा खर्च मात्र मान्यता मिळवून आहे !) अंत्यसंस्काराला वा तत्संबंधी खर्चाला फाटा देणे हे येथे समाजमान्य नाही; किंबहुना याप्रसंगी खर्चात काटछाट करणे हेही अनुचित समजले जाते. हा अंत्यसंस्कार उद्योग परंपरेने चालत आलेली काही ठराविक घराणीच करतात आणि त्यांची संख्याही अर्थातच कमी आहे. साधारणपणे सर्वत्र एकसारखेच दर व पद्धती असतात, त्यामुळे त्यांच्यात निवड करण्यासही वाव नसतो.

जपानमधील या उद्योगाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा सविस्तर अभ्यास करून अमेरिकेतील कोलोरॅडो येथील 'ऑल स्टेट क्रिमेशन सर्व्हिसेस' या कंपनीचे संचालक जॉन कॅम यांनी, आपल्या कंपनीची एक शाखा जपानमध्ये उघडायची असे ठरविले. जॉन कॅम यांचाही, हा कौटुंबिक उद्योग आहे. जपानमधील लोकांनी आपल्या कंपनीकडे वळावे यासाठी, त्यांनी सर्वात सोपा मार्ग अवलंबिला आहे, तो म्हणजे अंत्यसंस्काराच्या खर्चात कपात करणे. जपानमधे सध्या येणाऱ्या खर्चाच्या तुलनेत अगदी कमी, म्हणजे २,३४० अमेरिकन डॉलर्स (अंदाजे दीड ते दोन लाख रुपये) एवढ्या किंमतीत त्यांनी ही सेवा देऊ केली आहे. त्यांच्या कंपनीने प्रत्येक वस्तू

वा सेवा यांच्या वेगवेगळ्या किंमती ठेवल्या असून ही सेवा घेऊ इच्छिणारे आपल्या पसंतीप्रमाणे आणि आपल्या एकूण खर्चाचा अंदाज घेऊन फुले वा तत्सम बाबींची निवड करू शकतात. त्यामुळे अपेक्षेप्रमाणे त्यांना सर्व काही मिळू शकते. जपानमधील उद्योगांकडून असा निवडीला वाव दिला जात नाही.

शिवाय जॉन कॅम आणखी एक काम मात्र आवर्जून करतात. ते म्हणजे, विख्यात शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन यांनी आपला अंत्यसंस्कार किती साधेपणाने करण्याबद्दल सूचना दिल्या होत्या ती गोष्ट, आपल्या कर्मचाऱ्यांनी, आपल्या कंपनीकडे येणाऱ्या सर्वांना सांगावी, असा आग्रहही धरतात. आपल्या कंपनीची सेवा अनेक नागरिक घेतील असे कॅम यांना वाटते. त्याचे एक कारण असेही आहे की, जपानमधील वयोवृद्ध नागरिकांची संख्या लक्षात घेता तेथील मृत्यूचा दर वाढता असेल, असा अंदाज जपानमधील 'फ्युनरल बिझिनेस मंथली'ने अलीकडेच व्यक्त केला आहे.

असे असले तरी, जपानमधील नागरिक सांस्कृतिकदृष्ट्या किती बदलले आहेत, यावर कॅम यांच्या उद्योगाचे यशापयश अवलंबून आहे. गेल्या दशकात मात्र जपानमधे सांस्कृतिकदृष्ट्या निषिद्ध अशा काही बारीक -सारीक गोष्टी, उदाहरणार्थ, आपले जुने कपडे बाजारात विकणे किंवा पर्यटनाला बाहेर गेल्यावर हॉटेलमधील पैसे वाचविण्यासाठी रात्री आपल्या मोटारीतच राहणे इत्यादी, येथील नागरिक करीत आहेत. जपानमधील अंत्यसंस्कार उद्योगात, अग्रगण्य असलेल्या कोएकिशा कंपनीचे अध्यक्ष ताकेशी योशिडा यांच्या मते, "येथील अंत्यसंस्कारांचा अनुभव घेतल्याशिवाय व त्यातील गंभीरता समजल्याशिवाय तुम्हाला हे अंत्यसंस्कार नीटपणे करता येत नाहीत. हा केवळ पैशाचा प्रश्न नाही तर ते संस्कार अर्थपूर्ण व्हावेत, याकडेही लक्ष द्यावे लागते. आणि येथील नागरिकांना हे हवे आहे." या त्यांच्या म्हणण्यात तथ्य असू शकेल, कारण कॅम यांची खर्चातील काटछाट किती नागरिकांना रूचेल, अशी शंका अनेकांना आहे. तरी काही नागरिकांनी या प्रकाराला पाठिंबाही दिला आहे.

आश्चर्य म्हणजे, कॅम यांना सरकारकडून मात्र कोणत्याही प्रकारची अडचण आलेली नाही, उलट मदतच मिळते आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'टोकियो बिझिनेस सपोर्ट सेंटर'चे संचालक काझुया नाकाजो यांच्या मते जपानमधील 'अंत्यसंस्कार उद्योग' फार जुन्या पद्धतीचे असून अमेरिकेतील उद्योगांसाठी ते आव्हानाचे ठरू शकेल.


*(संदर्भ - फार इस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू, ८ जुलै २००४)*

# कालप्रवाहात......

# मर्यादित पाणीसाठे आणि पाण्याचा वापर

इसवीसन २००३ हे ताज्या पाण्याचे वर्ष म्हणून घोषित करण्यात आले होते. आता तर इसवीसन २००५ ते २०१५ हे दशकच मुळी पाण्याचे दशक घोषित करण्यात आले आहे. पाण्याच्या या दशकात पाण्याबाबतची जागरूकता वाढावयास हवी आहे. कारण, आजही ४० देशांमधील कोट्यवधी नागरिकांना पाणीटंचाईशी सामना करावा लागतो. पृथ्वीवर उपलब्ध पाणीसाठ्यांमधील फक्त २.५ टक्के पाणी हे ताजे पाणी या गटात मोडते; आणि एक टक्क्यापेक्षाही कमी पाणी वापरण्यायोग्य आहे. काही ना काही कारणाने माणसाने वापरलेले १ लिटर पाणी हे आठ लिटर ताजे पाणी प्रदूषित करीत असते. खालील आलेखात विविध कारणांसाठी वापरण्यात आलेल्या पाण्याची टक्केवारी दर्शविण्यात आली आहे. शेतीसाठी सर्वात जास्त पाणी वापरले जाते.

**विविध क्षेत्रांतील पाणी वापराची टक्केवारी (इसवीसन २०००)**




*(संदर्भ - डाऊन टू अर्थ, १५ मे २००४)*

# पाहिजेत

## अर्थबोधपत्रिकेसाठी विक्री प्रतिनिधी

**आपल्या सोयीनुसार प्रबोधनात्मक काम करा व कमिशन बेसिसवर पैसे मिळवा !**

अर्थबोधपत्रिका या वैचारिक मासिकाचे वर्गणीदार वाढविण्यासाठी उत्साही उमेदवार (स्त्री / पुरुष) पाहिजेत. महाविद्यालयीन युवक / युवतीही चालतील.

आपल्या गावात वा शहरात पत्रिकेच्या वर्गणीदारांची संख्या वाढवून कमिशन बेसिसवर मानधन मिळवा. वयाची अट नाही. सविस्तर वैयक्तिक माहितीसह व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका यांच्याकडे संस्थेच्या पत्त्यावर अर्ज करावा.

## अर्थबोधपत्रिका भेट अंक योजना

अर्थबोधपत्रिका या वैचारिक उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले अभिनंदन व आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत.

अर्थबोधपत्रिका आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आमची योजना अशी की, आपण आपल्या परिचयातील अशा व्यक्तींची नावे व पत्ते पोस्टकार्डने किंवा आंतरदेशीय पत्राने आम्हाला कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना सभासद होता येईल.

## अर्थबोधपत्रिकेच्या जिज्ञासू सदस्यांसाठी सुवर्णसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व इतर विषयांवरील सुमारे बारा हजारावर ग्रंथ आहेत. हे ग्रंथालय अर्थबोधपत्रिकेच्या सदस्यांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

# ‘आनंदी’ गरिबी !

माणसाचा खरा आनंद पैशात मोजता येत नाही म्हणतात. ऐश्वर्य आणि अमाप पैसा असूनही अनेकजण दु:खी-कष्टीच असतात. म्हणूनच ‘दि वेल्थ ऑफ नेशन्स’ मधील, ज्या समाजातील बहुतांश लोक गरीब आणि कष्टकरी आहेत, तो समाज आनंदी आणि सुखी असूच शकत नाही’, या विधानाशी आपण सहमत होऊ शकत नाही. या विधानाच्या अगदी उलट निष्कर्ष ‘वर्ल्ड व्हॅल्यू सर्व्हे’ने १९९९ -२००१ दरम्यान, पासष्ट देशांच्या केलेल्या सर्वेक्षणात काढला आहे. ब्रिटीश मासिक ‘न्यू सायंटिस्ट’ने तो सर्वप्रथम प्रसिद्ध केला आहे. त्यांच्या सर्वेक्षणानुसार गरिबीने गांजलेल्या नायजेरीया देशात ‘आनंदी लोकां’चे प्रमाण सर्वाधिक आहे.

सर्वांतेने सोळाव्या शतकात विधान केले होते की, ‘There are but two families in the world, the haves & the have-nots.’ सोळाव्या शतकात हे विधान करताना, एकविसाव्या शतकात ज्यांच्याकडे काहीच नाही, त्यांच्याकडे सुखाच्या आणि आनंदाच्या हिशोबात मात्र बरेच काही असेल, असा हिशोब त्याने खचितच केला नसेल. आपल्या दृष्टीने अमेरिका हा संपन्न देश असला तरी ‘आनंदी समाजा’च्या यादीत त्याला सोळावे स्थान आहे.ज्या देशाच्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात ‘मानवी जीवन, स्वातंत्र्य, सुखाचा पाठपुरावा’ यांना अग्रस्थान आहे, ज्या देशाची अर्थव्यवस्था बळकट असून लष्कर सामर्थ्यशाली आहे, असा अमेरिकेसारखा देश पहिल्या दहात नसावा ही आश्चर्याची गोष्ट आहे. नायजेरिया खालोखाल मेक्सिको, व्हेनेझुएला, अल् -साल्वाडोर आणि प्युरिटो रिको यांचे नंबर लागतात. एकोणिसाव्या शतकातील अमेरिकन लेखक हॉथॉन म्हणतो, या जगात सुख प्रसंगानुसार येते. आपल्याला सुख हवे म्हणून त्याच्या पाठीमागे धावणे यासारखा दुसरा मूर्खपणा नाही. ‘लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स’चे रिचर्ड लेयर्ड म्हणतात, सुखी आणि समाधानी नातेसंबंधांमुळे माणूस आनंदी राहतो. परस्परविश्वासावर आधारलेले असे संबंध नायजेरियातील जनतेला कठीण काळातही आनंदी राहण्याचे बळ देतात. याउलट व्यक्तिगत सुखाच्या मागे जाण्यामुळे समाज भौतिकदृष्ट्या प्रगत होतो खरा, पण सरतेशेवटी प्रसिद्ध अमेरिकन लेखक नॉर्मन मेलर म्हणतो त्याप्रमाणे ते ‘वातानुकूलित दु:स्वप्नच’ (Airconditioned Nightmare) ठरते.

*(संदर्भ - इकॉनॉमिक टाइम्स)*

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./61/VIII/2003
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006
L.W.P. LICENCE NO. L-502

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

• अजित कर्णिक • विकास चित्रे • कुमुदिनी दांडेकर
• ललित देशपांडे • द.ना. धनागरे • आनंद नाडकर्णी • रमेश पानसे
• मनोहर भिडे • नीळकंठ रथ • के. एन्. राज • व्ही.एम्.राव • ए.वैद्यनाथन
• सत्यरंजन साठे • रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे**